ऑफीस असिस्टंट पाहिजे
महिला/पुरुष वयाची अट नाही,
सुस्वभावी अर्जासह भेटा
(कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक)
साई इन हॉटेल, मु.चोंढी, रेवस रोड अलिबाग

रायगड, गुरुवार दि. ११ जानेवारी २०२४

कृषीवल

किंमत ४ ₹

निसर्ग हॉलीडेज
सिंगापूर मलेशिया दि. २४/४/२०२४ ६ दिवस
१ साईट प्लेन, १ साईट ट्रेन, रुपये- ९०,०००/-
थायलंड, बँकॉक, पटाया - ६/५/२०२४
५ दिवस रुपये - ४८,०००/-
बालाजी (तिरुपती) कोल्हापूर
१/३/२०२४, १/५/२०२४ ५ दिवस
रुपये - ७,५००/- दोन्ही साईट ट्रेन
दिल्ली, आग्रा, अमृतसर, वैष्णवदेवी, मुंबई
२०/३/२०२४
८ रात्री ९ दिवस
साईट प्लेन, १ साईट ट्रेन
रुपये - १९,०००/-
संपर्क - चंद्रकांत म्हात्रे, ९२६०७४५३२६,अभिनव ठोंबरे- ७७२१९२७४०४
प्रभाकर पटेल- ९८८०२४१६६९ (प्रवाशांनकरीता आकर्षक गिफ्ट)

विशेष संपादकीय

उघड गुपिते फुटली

राहुल नार्वेकर यांचा निकाल हा अनेक उघड गुपिते फोडणारा आहे. निकालात कोणालाच अपात्र ठरवले जाणार नाही अशी एक अटकळ काही दिवसांपासून व्यक्त होत होतीच. लोकसभा निवडणुकीच्या ऐन तोंडावर राज्याच्या राजकीय चित्रात काहीही बदल होऊ नये याची काळजी विधानसभा अध्यक्ष घेतील असा त्या अंदाजामागचा तर्क होता. बुधवारी अखेर तो खरा ठरला. नार्वेकरांनी शिंदे गटाला अपात्र ठरवले असते तर अजितदादा गटाचाही प्रश्न निर्माण झाला असता व सरकारच कोसळले असते. दुसऱ्या बाजूने ठाकरे गटाला अपात्र ठरवले असते तर उद्धव यांच्याबाबतची सहानुभूती वाढली असती. त्यामुळे असे काही होऊ नये याची काळजी घेतली जाईल हे एका अर्थी उघड गुपित होते. सर्व भारतभरातले विधानसभा अध्यक्ष आजवर हेच करीत आले आहेत. दुसरे मोठे उघड गुपित हे पक्षांच्या रचनेबाबतचे आहे. भारतातले बहुतेक राजकीय पक्ष हे गृहनिर्माण सोसायट्यांप्रमाणेच चालवले जातात. या पक्षांच्या घटना या नावालाच असतात. पक्षांतर्गत निवडणुका, कार्यकारिणीचे ठराव इत्यादींबाबतचे नियम कागदावर राहतात. पक्ष एकसंध असतो आणि नेते मजबूत असतात तोपर्यंत सर्व धकून जाते. पण फाटाफूट झाली आणि कोणी कायद्यावर बोट ठेवले तर मूळ पक्षवाल्यांकडे बरीच खोट निघू शकते. ठाकरे गटाबाबत नेमके हेच झाले. सेनेची मूळ घटना वा नंतरची दुरुस्ती पक्षप्रमुखाचे अधिकार, कार्यकारिणीची बैठक झाल्याचे पुरावे याबाबत ठाकरे गट आपली भूमिका ठोसपणे मांडू शकला नाही असे दिसते. अर्थात, नार्वेकरांनी निकाल आधीच ठरवला होता व सुनावणीतील ठराविकच मुद्द्यांचा त्यांनी विचार केला असा आक्षेप ठाकरे गट घेऊ शकतो. पण आता हे प्रकरण अपिलात जाईल तेव्हा त्यांना अधिक काटेकोर पुरावे सादर करावे लागतील हे नक्की. यापूर्वी विधिमंडळ पक्षातील बहुमताला मोठे ठरवून निवडणूक आयोगाने शिंदे यांची सेना अधिकृत ठरवली होती. ठाकरे नाव असलेल्या पक्षप्रमुखांचा शब्ददेखील शिवसेनेत अंतिम ठरू शकत नाही असा त्याचा दुसरा अर्थ होता. आजच्या निकालाने त्यावर शिक्कामोर्तब केले व तेही उघड गुपित फोडले. आजच्या निर्णयाने या सुनावणीबाबतचे तर्कवितर्क संपले हे एक बरे झाले. अर्थात त्याने अनेक प्रश्नांनाही जन्म दिला आहे. त्याबाबत सविस्तर चर्चा उद्या करु. एक खरे की, ठाकरे यांना लोकांमध्ये जाऊनच खरी लढाई करावी लागेल.

हेही पात्र, तेही पात्र

। मुंबई । प्रतिनिधी । विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेना आमदार अपात्रतेचा निकाल पूर्णपणे एकनाथ शिंदे यांच्या बाजूने दिला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बुधवारी (दि.१०) शिवसेना आमदार अपात्रतेच्या प्रकरणाच्या निकालाचं वाचन केलं. यावेळी विधानसभा अध्यक्षांनी विधीमंडळ पक्ष ज्यांचा त्यांचाच राजकीय पक्ष असा मोठा निकाल दिला. त्यामुळे खरी शिवसेना ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीच असल्याचा निकाल विधानसभा अध्यक्षांनी दिला. विधानसभा अध्यक्षांनी भरत गोगावले यांची प्रतोदपदी नियुक्ती वैध ठरवली आहे. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे सर्व १६ आमदार विधानसभा अध्यक्षांनी पात्र ठरवले आहेत. तर ठाकरे गटाला धक्क्यावर धक्के देण्यात आले. पण या निकालात ठाकरे गटाला एक मोठा दिलासा नक्कीच मिळाला. विधानसभा अध्यक्षांनी ठाकरे गटाचे देखील सर्व आमदार पात्र ठरवले आहेत.

या निर्णयाचे मला आश्चर्य वाटले नाही. सत्ताधारी पक्षांतील नेत्यांनी काय निकाल लागणार याबाबत आधीच भाष्य केलेले होते. मी जो निकाल ऐकला त्याप्रमाणे उद्धव ठाकरेंना सर्वोच्च न्यायालयात जावे लागेल. या निकालाच्या भाष्यावरून उद्धव ठाकरे यांना सर्वोच्च न्यायालयात न्याय मिळेल अशी खात्री निकालावरून वाटते. त्यामुळे हा निर्णय आता जनतेच्या न्यायालयात गेला आहे.वधानसभा अध्यक्षांनी दिलेला निकाल न्यायालयीन नसून राजकीय निकाल आहे. त्यामुळे आम्हाला उत्तम संधी प्राप्त झाली आहे.

– शरद पवार , अध्यक्ष , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

काल नार्वेकरांनी भेट घेतली तेव्हाच निकाल स्पष्ट झाला होता. लोकशाहीची हत्या केली. पक्षांतराचा राजमार्ग आज राहुल नार्वेकरांनी दाखवला. शिंदेंची शिवसेना होऊच शकत नाही. नार्वेकरांच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाणार.

– उद्धव ठाकरे

विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निर्णय देशासाठी मोठे संकेत आहेत. २०२४ मध्ये अशा प्रकारची गद्दारी झाली, खोक्यांचे राजकारण झाले,तर अशाच प्रकारे त्यांना वाचवलं जाणार भाजपाला आपलं संविधान बदलायचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहून दिलेले संविधान भाजपला मान्य नाही, भाजपला स्वतःचे संविधान आणायचे आहे, हे स्पष्ट झाले.

– आदित्य ठाकरे

शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर ठाकरे गटाने एकनाथ शिंदे, अब्दुल सत्तार, संदीपान भुमरे, संजय शिरसाट, तानाजी सावंत, यामिनी जाधव, चिमणराव पाटील, लता सोनावणे, भरत गोगावले, प्रकाश सुर्वे, बालाजी किणीकर, अनिल बाबर, महेश शिंदे, संजय रायमुलकर, रमेश बोरनारे, बालाजी कल्याणकर या सोळा आमदारांना अपात्र ठरवण्याची मागणी केली होती. तशी याचिकाही दाखल केली होती. याबाबत निर्णय देत असताना एकाही आमदाराला अपात्र ठरवता येणार नसल्याचं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म्हटलं आहे.

आमदार संपर्काच्या बाहेर गेले, केवळ याच कारणास्तव आमदारांना अपात्र ठरविता येणार नाही. शिवाय, ठाकरे गटाचे मिलिंद नार्वेकर, रविंद्र फाटक यांनी सुरतेत एकनाथ शिंदे यांची भेट घेतली हे ही सिद्ध झाले. सत्तांतराच्या काळात खरा पक्ष हा शिंदेंचा हे सिद्ध झाल्याने २१ जून २०२२ च्या शिवसेना विधिमंडळ पक्षाच्या बैठकीतील पान २ वर

ठाकरे गटाकडे आता पुढचा पर्याय काय?

उद्धव ठाकरे यांना आता पुन्हा सर्वोच्च न्यायालयात जाऊन विधानसभा अध्यक्षांच्या निकालाला आव्हान द्यावे लागणार आहे. ठाकरे गटाकडून प्रत्येक बारीक सारीक गोष्ट न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली जात आहे. राहुल नार्वेकर आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नुकतीच दोन दिवसांपूर्वी भेट घडून आली होती. याबाबतही ठाकरे गटाकडून सर्वोच्च न्यायालयात कागदोपत्री माहिती देण्यात आली आहे.

ठाकरे गटाच्या आमदारांना शिंदे गटाच्या प्रतोदांचा आदेश मानावा लागणार

सर्वोच्च न्यायालयातील वकील सिद्धार्थ शिंदे यांनी या निकालावर प्रतिक्रिया दिली. नार्वेकर यांनी उद्धव ठाकरे यांची मागणी फेटाळली आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री राहतील, असं वकील शिंदे यांनी सांगितलं. उद्धव ठाकरे यांना आता या विरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपिल करावे लागेल. नार्वेकर यांनी त्यांच्या सदसदविवेक बुद्धीने निर्णय दिला आहे. कोणताच आमदार अपात्र नाही असा निकाल राहुल नार्वेकर यांनी दिला आहे. हा निकाल देताना त्यांनी भरत गोगावले यांचा व्हीप मान्य करावा लागेल, असे म्हटले आहे. याचा अर्थ जर उद्धव ठाकरे यांचे आमदार एकनाथ शिंदे यांच्यासोबत आले नाहीत तर त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई होऊ शकते, असेही ते म्हणाले.

नार्वेकर यांच्या निकालातील पाच ठळक मुद्दे

१. शिंदे गट खरी शिवसेना आहे.

२. भरत गोगावलेंची प्रतोदपदी नियुक्ती वैध ठरते.

३. शिंदेंना गटनेतेपदावरुन काढण्याचा अधिकारी ठाकरे यांना नव्हता.

४. शिंदे गटाचे सदस्य संपर्काच्या बाहेर गेल्याचं सादर पुराव्यांवरून सिद्ध होत नाही.

५. सुनील प्रभूंना पक्षासाठी कोणतीही बैठक बोलावण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे शिंदे गटाच्या सदस्यांवर अपात्रतेची कारवाई करण्याची मागणी फेटाळली जात आहे.

वेधक

तलावात बुडून महिलेचा मृत्यू

माणगाव : तालुक्यातील इंदापूर येथील सरकारी दवाखान्याजवळील तलावाच्या पाण्यात बुडून एका ६० वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेची खबर राम मालू वाघमारे यांनी माणगाव पोलिस ठाण्यात दिली. सदर घटनेबाबत माणगाव पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील वृद्ध महिला जना मालू वाघमारे रा. गौळवाडी आदिवासीवाडी इंदापूर, ता. माणगाव या रानात लाकडे आणण्यासाठी गेल्या असता तलावाच्या पाण्यात पडून बुडाल्या. त्यांना उपचाराकरिता उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे आणले असता त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. या घटनेची नोंद माणगाव पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

वादातून केला बारमध्ये गोळीबार

डोंबिवली : ऑर्केस्ट्रा बारमध्ये दारू पित असताना खुर्चीला धक्का लागल्याने दोन गटात वाद झाला आणि या वादातून एकाने थेट पिस्तुल काढून दुसऱ्या गटातील तरुणावर गोळी झाडली. जखमी तरुणावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. लाईव्ह ऑर्केस्ट्रा बारमध्ये रात्रीच्या सुमारस अजय सिंग हा मित्रांसोबत दारू पीत होता. त्याच्याच बाजूचा टेबलवर विकास भंडारी हा देखील आपल्या मित्रासोबत दारू पीत बसला होता. पार्टी रंगात आली असताना खुर्चीला धक्का लागल्याने अजय सिंग व विकास भंडारी या दोघांमध्ये वाद सुरू झाला.हा वाद इतका विकोपाला गेला की सिंग याने संतापाच्या भरात आपल्या जवळील पिस्तुलाने गोळी झाडली. सुदैवाने ही गोळी विकासाच्या खांद्याला लागली. या हल्ल्यात विकास बचावला असला तरी जखमी झाला आहे.

दिलीप भोईर समर्थकांकडून तरुणावर हल्ला

रस्त्यात अडवून मारहाण करीत दरोडा टाकण्याचा प्रयत्न

। अलिबाग । प्रतिनिधी ।

बँकेत जाणाऱ्या एका तरुणावर दिलीप भोईर समर्थकांनी जीवघेणा हल्ला केला. यामध्ये तो तरुण गंभीर जखमी झाला असून त्याला अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. ही घटना बुधवारी (दि.१०) सकाळी झिराड येथे घडली. त्याच्याकडील सात लाख ५८ हजार रुपये व दीड तोळे सोन्याची चेन गायब करण्यात आल्याची माहिती जखमीने दिली. कंपनीत माल टाकण्यावरून पान २ वर

बँकेत पैसे भरण्यासाठी जात असताना दिलीप भोईरच्या काही मंडळींनी अडवले. काम करायचे असेल, तर दिलीप भोईर यांना एक लाख रुपये द्यावे लागतील, असे सांगितले. त्यानंतर लाठी-काठ्यांनी मारहाण करून गंभीर जखमी केले. यावरून झिराडमध्ये मनमानी कारभार सुरु असल्याचे स्पष्ट होते.

- अभिलाष पाटील, जखमी

खासगी कामावरून झिराडमध्ये तरुणावर झालेला हल्ला निंदनीय आहे. याबाबत पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन तेथील गैरप्रकारावर अंकुश ठेवण्याची मागणी केली जाईल. ही हुकूमशाही शेकाप कदापि सहन करणार नाही.

- चित्रलेखा पाटील- शेकाप महिला आघाडी प्रमुख

आता परत येणार नाही

आमदार राजन साळवी यांचा इशारा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

उद्धव ठाकरे गटाचे आमदार राजन साळवी यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांना पुन्हा चौकशीसाठी १० जानेवारीला बोलावण्यात आले होते.अडीच तास झालेल्या चौकशीनंतर राजन साळवी परतीच्या मार्गावर निघाले. दरम्यान ते म्हणाले,लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला जी माहिती पाहिजे ती दिली आहे. मात्र परत आता चौकशीसाठी येणार नाही, असा इशारा साळवी यांनी दिला.

गेल्या वर्षभरापासून आमदार राजन साळवी व त्यांच्या कुटुंबियांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुरु आहे. त्यांच्या आर्थिक व्यवहाराची माहिती या विभागामार्फत घेतली जात आहे. त्यासाठी साळवी यांना अलिबाग येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयात वारंवार चौकशीसाठी बोलवले जाते. बुधवार दि. २७ डिसेंबर रोजी साळवी यांच्यासह पान २ वर

कोर्लई किल्ल्याच्या दरवाजावर आढळले धमकीपत्र

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

मुरूड तालुक्यातील कोर्लई किल्ल्याच्या दरवाजावर अज्ञाताने शिवप्रेमी नावाने पुरातत्व विभागाच्या कर्मचाऱ्यासह कुटुंबाला ठार मारण्याचे धमकीपत्र चिकटवल्याचे आढळल्याने खळबळ उडाली आहे. याबाबत कोर्लई किल्ल्यातील पुरातत्व विभागाचे एमटीस अधिकारी गोकुळ बिऱ्हाडे यांनी रेवदंडा पोलिसांकडे तक्रार नोंदविली आहे. रेवदंडानजीक मुरूड तालुक्यातील पान २ वर

कोर्लई किल्ल्याचा दरवाजा बंद करण्याचा आमचा निर्णय नाही. पुरातत्व विभागाच्या आदेशानुसार सायकांळी सहा ते सकाळी आठ वाजेपर्यंत कोर्लई किल्ल्याचे दरवाजे बंद करण्यात येतात. हा नियम किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या सर्वांसाठी समान आहे.

-गोकुळ बिऱ्हाडे, पुरातत्व विभाग अधिकारी

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाला निर्देश

पद्मदुर्गचा होणार विकास

। रायगड । प्रतिनिधी ।

कोकणच्या पर्यटन विकासासाठी किनारी भागातील जलदुर्गांचा विकास करताना जेट्टीसारख्या सुविधांची उभारणी करावी. रायगड जिल्ह्यातील मुरूड-जंजिरा येथे येणाऱ्या पर्यटकांना पद्मदुर्ग किल्ल्याकडे आकर्षित करण्यासाठी किल्ल्याच्या डागडुजीसह पर्यटन विकासाची कामे हाती घ्यावीत. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने पद्मदुर्गचा विकास आराखडा तयार करावा. पद्मदुर्ग येथे पर्यटन सुविधा निर्माण करण्यासाठी पर्यटन विभागाने सहकार्य करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली पान २ वर

रायगड जिल्ह्यातील पद्मदुर्ग हा ऐतिहासिक महत्वाचा किल्ला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी १६६४ मध्ये महाराजांनी सिंधुदुर्ग हा सागरी किल्ला बांधला. कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, पद्मदुर्ग आदी जलदुर्गांची उभारणी करुन काही किल्ल्यांवर जहाजे बांधण्यास प्रारंभ केला. सागरी लाटांच्या माऱ्यामुळे पद्मदुर्ग किल्ल्याच्या भिंती जीर्ण झाल्या आहेत. या किल्ल्याचा हेरिटेज दर्जा राखून संवर्धनाची कामे करणे आवश्यक आहे, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

पद्मदुर्गचा विकास आराखडा होणार तयार

कळंब बोरगाव ७९ लाखांचा रस्ता उखडला

ठेकेदाराची डांबरात कसूर ग्रामस्थांचा आरोप; काळ्या यादीत टाकण्याची मागणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील कळंब बोरगाव या रस्त्याचे काम जून महिन्यापासून सुरु करण्यात आले होते. या रस्त्यासाठी तब्बल ७९ लाख रुपये खर्च करण्यात येत आहेत. मात्र खडीकरण केले जात असतानाच रस्त्यावरची खाडी अनेक ठिकाणी उखडून बाहेर आली आहेत. त्यामुळे अपघात देखील झाले आहेत. ठेकेदाराने खडीकरण करताना डांबरात कसूर केल्याने ठेकेदाराला काळ्या यादीत टाका अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

कर्जत तालुक्यातील कळंब ते बोरगाव या ५ किलोमीटरच्या रस्त्यांपैकी कळंब येथून काही भागाच्या रस्त्याचे काम शासनाकडून मंजूर करण्यात आले होते. या रस्त्यासाठी ७९ लाख ३४ हजार १३४ रुपये निधीची तरतूद करण्यात आली होती. तर २४ मे २०२३ ला या कामाचे कार्यारंभ आदेश ठेकेदार वृषाली रमेश शितोळे यांच्या नावाने देण्यात आले होते. मात्र कामाला सुरुवात करताना ठेकेदाराने अनेक ठिकाणी अंदाजपत्रकाला बगल काम केल्याचे चित्र आहे. त्यामुळे सुरवातीला साईडपट्टी तर आता खडीकरण केल्यानंतर रस्त्यावरील खाडी अनेक ठिकाणी उखडून बाहेर आली आहे. तर त्यात डांबराचा लवलेश सुद्धा नाही. अनेक ठिकाणी खडी उखडून बाहेर आल्याने तिथे खड्डे तयार झाले आहेत. त्यामुळे या खड्यात पडून काही तरुण देखील जखमी झाले आहेत. त्यामुळे एकाच्या दर्जाबाबत आता ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. अनेक वर्षांनी एवढा मोठा निधी खर्च होऊन रस्ता होत असताना त्याच्या दर्जाबाबत हयगय खपवून घेतली जाणार नाही अशी भूमिका आता गावकर्यांनी घेतली आहे.या रस्त्याची गुणवत्ता व दर्जा गुणनियंत्रक मंडळाने तपासावा अशी मागणी करत निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाका अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान तब्बल ७९ लाख रुपयांचे काम होत असताना त्याचा दर्जा अनेक ठिकाणी खालावलेला आहे. तर बांधकाम विभागाकडून ठेकेदरला वेळा नोटीस देण्यात येऊन देखील ठेकेदार त्या नोटिसीकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे आता रायगड जिल्हा परिषदेचा बांधकाम विभाग ठेकेदावर कारवाई करणार कि त्याचे लाड करणार हे पाहणे महत्वाचे आहे.

> या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे सुरु आहे. त्यामुळे अनेक तरुण पडून अपघात झाले आहेत. अशा निकृष्ट दर्जाच्या रस्त्यावर ठेकेदार डांबरीकरण करणार असेल तर हा रस्ता टिकणार नाही तेव्हा या रस्त्याची वरिष्ठ पातळीवर चौकशी करण्यात यावी व दोषी ठेकेदाराला काळ्या टाकावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.
> – एकनाथ खडेकर, ग्रामस्थ

> सदर रस्त्याबाबत तक्रार आल्यावर मी स्वतः त्याची पाहणी केली. तसेच अगोदरदेखील ठेकेदाराला आमच्या विभागाकडून नोटीस देण्यात आल्या आहेत. खराब भाग दुरुस्त करून घेतला जाईल. चांगले काम करून घेणे आमचे काम आहे.
> – के.एम. परब, कनिष्ठ अभियंता, बांधकाम उपविभाग कर्जत

महिला फार्मासिस्ट रिफ्रेशर्स कोर्सचे आयोजन

। उरण । वार्ताहर ।

सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त महिला फार्मासिस्टच्या सक्षमीकरणासाठी केमिस्ट असोसिएशन उलवे व महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल यांच्यामार्फत विशेष महिला फार्मासिस्ट रिफ्रेशर्स कोर्सचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले होते. सुमारे १०० महिला फार्मासिस्ट यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

आप्पासाहेब शिंदे यांच्या संकल्पनेतून व महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिलचे अध्यक्ष अतुल अहीरे यांच्या नेतृत्वाखाली या कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. जिजाऊ आणि सावित्रीप्रमाणे राष्ट्र नवनिर्माणाचे सामर्थ्य घडण्याचे बळ आजच्या आपल्या फार्मासिस्ट भगिनीमध्ये यावे. यासाठी आप्पासाहेब शिंदे हे नेहमीच प्रोत्साहन व मार्गदर्शन करत असल्याचे सीमा सुभाष पाटील यांनी प्रास्ताविकात सांगितले. अहीरे यांनी महिला फार्मासिस्टच्या सक्षमीकरणासाठी शिक्षणासाठी महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल सदैव तत्पर राहील, अशी ग्वाही दिली. यावेळी अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त डॉ. डी. सी. शेख, महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिलचे सदस्य नितिन मनियार, रजिस्ट्रार सायली मसाळ, मुंबई झोनचे सेक्रेटरी सुनील छाजेद, रायगड जिल्हा केमिस्ट अँड डिस्ट्रिब्युटर्स असोसिएशनचे अध्यक्ष लीलाधर पाटील यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी औषध निरीक्षक भाग्यश्री कदम, मंजिरी घरत, विनिता खानविलकर, निर्मल कासेकर , डॉ. विनया कुलकर्णी यांनी फार्मासिस्टला मार्गदर्शन केले. या कोर्ससाठी रायगड जिल्ह्यातील विविध भागातील महिला फार्मासिस्ट मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केमिस्ट असोसिएशन उलवे आणि रायगड जिल्हा व पनवेल तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रिब्युटर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

बालसेवा केंद्र शिबीर संपन्न

। रोहा । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील श्री स्वामी समर्थ बाल संस्कार केंद्रातर्फे बालसेवा केंद्र शिबीर मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

गुरुपीठाच्या आदेशानुसार चोंढी केंद्रातर्फे व अनघा आमल, आर.आर.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चोरंडे-अधिकारीवाडी येथे मूल्यसंस्कार शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ६ ते १६ वर्षे वयोगटातील मुले आणि मुली यांचा समावेश होता. या शिबिरात एकूण ९० मुले व मुलींनी सहभाग नोंदवून शिबिरातील सर्वच उपक्रमांचा आनंद घेतला. दिवसभराच्या या शिबिर सत्रात गुरुपीठाकडून आलेल्या पत्रकाप्रमाणे नियोजन पद्धतीने कार्यवाही करून शिबीर संपन्न करण्यात आले. तसेच शिबिराच्या यशस्वितेसाठी नेमून दिलेल्या बालसंस्कार पथकाने शिबिराचे योग्य नियोजन केले. केंद्रातील सर्व सहकाऱ्यांनी सहकार्य केले. मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी आलेल्या सर्व डॉक्टर्स यांनी मुलांना आरोग्य व आहार तसेच दैनंदिन जीवनातील चांगल्या सवयींबाबत मार्गदर्शन केले. दिवसभराच्या या शिबिरात सहभागी झालेली सर्व मुले आणि मुली यांनी सर्वच उपक्रमात सहभागी होऊन मनमुरादपणे आनंद लुटला.

भीमथडी अश्वांना अधिकृत प्रजाती म्हणून मान्यता

पुणे : मराठा घोडदळाचा अविभाज्य भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भीम थडी अश्वांना आता अधिकृत स्वतंत्र प्रजाती म्हणून मान्यता मिळाली आहे. या संदर्भात नुकतीच अधिसूचना जारी करण्यात आली आहे. आता अनेक वर्षे भीमथडी अश्वांचा प्रलंबित असलेला अधिकृत अश्व प्रजातीचा दर्जा त्यांना मिळाला असल्याची घोषणा अखिल भारतीय भीमथडी अश्व संघटनेचे संस्थापक रणजीत पवार यांनी पत्रकार परिषदेत केली.

रणजीत पवार म्हणाले, भीमथडी अश्वांच्या प्रजातीचा उगम महाराष्ट्रात भीमा नदीच्या काठी झाला. हे अश्व दख्खनच्या पठारावर प्रामुख्याने पुणे, सातारा, सोलापूर, अहमदनगर, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्याच्या काही भागात आढळतात. भीमथडी अश्वांनी मराठा साम्राज्याचे घोडदळ म्हणून स्वराज्याच्या मोहिमांमध्ये अत्यंत महत्वाची कामगिरी बजावली आहे.

डॉ.मेहता म्हणाले, भीमथडी अश्व प्रजातीला हा अधिकृत दर्जा मिळवून देण्यासाठी १००० हून अधिक घोड्यांच्या रक्ताचे नमुने गोळा करून ते नॅशनल रिसर्च सेंटर फॉर इक्विन्स यांकडे पाठवण्यात आले. यांतील ५०० हून अधिक नमुन्यांची डीएनए चाचणी करीत ही खरोखरच एक स्वतंत्र प्रजाती आहे आणि कोणत्याही प्रस्थापित प्रजातीसोबत तिचा डीएनए जुळत नाही याची खात्री करून घेण्यात आली. मान्यतेसाठी आलेल्या ६६ अर्जांमधून केवळ ८ प्रजातींना मान्यता मिळाली आहे.

ग्रंथालयासाठी पुस्तके पाठवण्याचे आवाहन

रसायनी : अक्षर मानव ग्रंथालय विभागाकडून महाराष्ट्रभर वाचनालय सुरू होत असून सध्या सात्रळ रसायनी, राळेगणसिद्धी, बावी, दौंड, धायरी आणि रावणगाव, औरंगाबाद, आंबेड बुद्रूक या ठिकाणी ही वाचनालये सुरू आहेत. राज्यातील अन्य ठिकाणी ग्रंथालये सुरु करण्यासाठी संस्थेने पुढाकार घेतला आहे. कोणत्याही भाषेतील जुनी पुस्तके असल्यास ती अक्षर मानवला देणगी म्हणून देण्यात यावी, असे आवाहन रसायनीतील जेष्ठ साहित्यिक रोहिदास कवळे अक्षर मानव ग्रंथालय विभाग प्रमुख यांनी केले आहे. वाचन संस्कृती रूजवण्याचा प्रयत्न अक्षर मानव संस्थेच्यावतीने होत असल्याचे दिसून येते. सुमारे पाच-सहा लाखाची पुस्तके देणगी स्वरुपात प्राप्त झाली आहेत. कोणत्याही भाषेतील जुनी पुस्तके असल्यास ती अक्षर मानवला देणगी म्हणून देण्यात यावी, असे आवाहन रसायनीतील जेष्ठ साहित्यिक रोहिदास कवळे अक्षर मानव ग्रंथालय विभाग प्रमुख यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९३७००३५६७६ या क्रमांकावर संपर्क साधावा.

नांदगावला शेतकऱ्यांसाठी परिषद

खारेपाट : महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाच्या वतीने शनिवारी १३ जानेवारी २०२४ रोजी मुरुड-नांदगाव माळी समाज सभागृह येथे कृषी फलोत्पादन, सेंद्रिय सिंचन, फळपिक विमा, प्रक्रिया, मार्केटिंग परिषदेचे व प्रदर्शनाचे आयोजन केले असल्याची माहिती परिषदेचे मुख्य संयोजक व महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी दिली.

मागील ५-६ वर्षे जागतिक हवामान बदलामुळे आंबा भाजीपाला, फळे व सर्व प्रकारच्या फलोत्पादनावर मोठया प्रमाणात कीड रोगांचा प्रादुर्भाव होत आहे. त्यामुळे उत्पादन घटून ते अवघे ४० टक्क्यावर आले आहे. यासाठी अत्यावश्यक उपाययोजनांची माहिती कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ व तज्ज्ञ यांच्यामार्फत शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. यावेळी कृषी फलोत्पादनासाठी अत्यावश्यक खते, कीडकनाशके तसेच उत्पादन वृध्दीसाठीची उत्पादने, अवजारे यांचे प्रदर्शन देखील आहे.

या कार्यक्रमास डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. प्रकाश शिनगारे, राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टिलायझर्स लि. चे महाव्यवस्थापक (एचआर) संजीव हरलीकर, विभागीय अधिक्षक कृषी अधिकारी कोकण बालाजी ताटे, डायना बायोटेक लि. पुण्याचे सीएमडी डॉ. विनोद कुमार, गोदरेज ॲग्रोवेट लि. चे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचे औचित्य साधून कृषी फलोत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांना सन्मानित करण्यात येणार आहे.

तसेच शेतकऱ्यांसाठी प्रश्नोतराचा कार्यक्रम पार पडणार आहे. हा कार्यक्रम सकाळी १०.०० ते सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत सर्वांसाठी खुला आहे, तरी शेतकरी बांधवांनी या कार्यक्रमात मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघाच्यावतीने काढण्यात आलेल्या प्रसिध्दी पत्रकातून केले आहे.

पान १ वरून

हेही पात्र, तेही पात्र

गैरहजरीच्या मुद्द्यावर अपात्रता ठरविता येणार नाही'', असं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर निकालाचं वाचन करताना म्हणाले. २१ जून २०२२ रोजीचा ठराव संमत केल्याने शिंदे शिवसेना अपात्र ठरतील असे म्हणणे योग्य ठरणार नाही. प्रतिस्पर्ध्याचा गट उदयास आला तेव्हा शिंदे गट हाच खरा राजकीय पक्ष होता, असे निष्कर्ष लक्षात घेता याचिकाकर्त्यांचा दावा फेटाळण्यात आला. उत्तरकर्त्यांनी भाजपसोबत संगनमत करून काम केल्याचे पुढचे कारण म्हणजे निव्वळ आरोप आहे. त्यासाठी त्यांनी कोणतेही कागदोपत्री पुरावे दिलेले नाही. पुढील कारण त्यांनी पक्षविरोधी विधान केले, यालाही पुरावे दिलेले नाही. त्याबाबतचे वृत्त केवळ अफवाच आहेत, असं निरीक्षण राहुल नार्वेकरांनी नोंदवलं. निवडणूक आयोगाकडे उद्धव ठाकरे गटाने सादर केलेल्या दाव्यातही तफावत आहे. एकीकडे ते सांगतात पक्षाची बैठक शिवसेना भवनात झाली, तर दुसरीकडे सांगतात ती बैठक ऑनलाईन झाली होती. त्यामुळे त्यांची कागदपत्र संभ्रम निर्माण करणारी आहेत. २१ जून २०२२ रोजी विधीमंडळ सचिवालयाकडे असलेल्या नोंदीनुसार शिंदे गटाकडे बहुमत दिसत आहे. त्यामुळे शिंदे गट हा त्या दिवशी खरा शिवसेना पक्ष असल्याचे दिसून येते, असंही अध्यक्ष म्हणाले.२१ आणि २३ जून २०२२ शिंदे गटाची पत्रे विधिमंडळ सचिवालयात आहे. या दिवशी शिंदे गट हाच खरी शिवसेना. भरत गोगावले यांची प्रतोद पदी नियुक्ती वैध आहे. एकनाथ शिंदे यांचे गटनेते पदी नियुक्तीही वैध आहे, असा मोठा निकाल राहुल नार्वेकर यांनी दिला.

आमदार अपात्रताप्रकरणी निकालाचं वाचन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेची २०१८ सालची घटनादुरुस्ती विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अवैध असल्याचं सांगितले . त्यामुळे निवडणूक आयोगाकडे असलेली १९९९ सालची घटना मान्य केली आहे. शिवसेनेची २०१८ ची सुधारित घटना भारतीय निवडणूक आयोगाच्या नोंदीमध्ये नसल्याने ती वैध मानली जाऊ शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, मी इतर कोणत्याही घटनेचा विचार करू शकत नाही. नोंदीनुसार, मी वैध संविधान म्हणून शिवसेनेच्या १९९९ च्या घटनेवर अवलंबून आहे, असं राहुल नार्वेकर म्हणाले. ठाकरे गटानं युक्तिवाद केल्याप्रमाणे पक्षप्रमुखांचा निर्णय हाच राजकीय पक्षाचा निर्णय मानला जायला हवा. पण त्यासंदर्भात सादर करण्यात आलेले पुरावे हे मान्य करण्यासाठी पुरेसे नाहीत. त्यामुळे हा मुद्दा अमान्य केला जात आहे. त्यामुळे पक्षातून किंवा पदावरून कुणाला काढण्यासंदर्भातले पक्षप्रमुखांना असणारे अधिकार राष्ट्रीय कार्यकारिणीच्या सल्ल्यानुसारच त्यांनी घ्यायला हवेत, असं शिवसेनेच्या पक्ष घटनेत नमूद केलं आहे. त्यामुळे शिवसेना प्रमुखांना पक्षाच्या कोणत्याही नेत्याला पदावरून काढण्याचा अधिकार नाही, असं निरिक्षण राहुल नार्वेकर यांनी नोंदवलं.खरी शिवसेना विधिमंडळ पक्षावरून ठरवली जावी. शिंदे गटाकडे ३७ आमदारांचं संख्याबळ आहे. माझ्या निरीक्षणावरून शिंदे गट हीच २२ जून रोजी खरी शिवसेना असल्याचं दिसून आलं आहे असंही राहुल नार्वेकर म्हणाले

कोर्लई किल्ल्याच्या दरवाजावर आढळले धमकीपत्र

पोर्तुगिज कालीन कोर्लई किल्ला आहे. भक्कम बांधकामाचे व तसेच पश्चिमेला अरबी समुद्र व पूर्वेला कुंडलिका खाडीचे डोळ्याचे पारणे फेडणारे निसर्गरम्य दृश्य यामुळे हा किल्ला पहाण्यासाठी पर्यटक व स्थानिक यांची नित्याने गर्दी असते. कोर्लई किल्ला भारतीय पुरातत्व विभागाचे अखत्यारीत असून पुरातत्व विभागाचे कर्मचारी या किल्ल्याची देखभाल करतात. हा किल्ला सायकांळी सहा ते सकाळी आठ वाजेपर्यंत बाहेरील व्यक्तींसाठी नेहमी बंद केला जातो. २५ डिसेंबर रोजी कोर्लई किल्ल्याच्या पूर्वेकडील बाजूला बंद असणाऱ्या लाकडी दरवाजाच्या फळ्या काढून अज्ञातांनी नुकसान केले. त्या दरवाजावर हे गेट तुम्ही बंद केलेत तर तुमची खानदानी नष्ट करू, पोरा सकट व गेट सकट तुमची घरे पण जाळून टाकू असे लेखी धमकीपत्र शिवभक्त नावाने चिकटविण्यात आले आहे. याबाबत कोर्लई किल्ल्यातील पुरातत्व विभागाचे एमटीस अधिकारी गोकुळ सुखदेव बिऱ्हाडे यांनी रेवदंडा पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे.

आता परत येणार नाही

त्यांच्या कुटुंबियांना चौकशीसाठी बोलवण्यात आले होते. मात्र ते हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यांना नोटीस देऊन १० जानेवारीला बोलावण्यात आले. दुपारी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास राजन साळवी, त्यांचा भाऊ दिपक साळवी, व पुतण्या दुर्गेश साळवी असे तिघेजण अलिबागच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयात दाखल झाले. दिपक साळवी व दुर्गेश साळवी यांची आज चौकशी करण्यात आली. त्यावेळी राजन साळवी देखील उपस्थित होते. अडीच तास चौकशी झाली. त्यानंतर राजन साळवी यांनी पत्रकारांची भेट घेतली. गेल्या दीड वर्षापासून आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या चौकशीला सामोरे जात आहोत. वाहनांची माहिती राहिली होती. ती माहिती या विभागाला दिली आहे. परंतु आता पुन्हा आम्ही येणार नाही, असे ते म्हणाले

तरुणावर हल्ला

हा वाद झाल्याचे त्याने सांगितले. याप्रकरणी परस्पर एकमेकांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. अभिलाष पाटील असे या जखमीचे नाव आहे. हा तरुण गेल्या अनेक वर्षापासून पोल्ट्री व्यवसायिक तसेच बांधकाम व्यवसायिक आहेत. एक महिन्यापूर्वी त्यांनी झिराडपाड्यातील एका कंपनीत बांधकामासाठी माल टाकला होता. त्याचा राग धरून दिलीप भोईर गटाच्या काही मंडळींमध्ये वाद निर्माण झाला होता. बुधवारी सकाळी अभिलाष पाटील चोंढी येथील बँक ऑफ इंडियामध्ये सात लाख ५८ हजार रुपयांचा भरणा करण्यासाठी निघाले. त्यावेळी झिराड येथील मुख्य रस्त्यावर पाटील यांना अडवण्यात आले. कंपनीत माल टाकण्याचे काम करायचे असेल, तर दिलीप भोईर तथा छोटमशेटला एक लाख रुपये द्यावे लागतील, नाहीतर तुला काम करून देणार नाही, अशी धमकी दिलीप भोईर यांच्या गटाने दिल्याचे पाटील यांनी सांगितले. त्यानंतर विक्रम सांळुखे, सोहेब मुल्ला, अनिकेत शिर्के, मोहम्मद शेख, संतोष सांळुखे व मनिष या सहा जणांनी लाठी, काठ्यांसह लाद्यांनी हल्ला करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला असल्याचेही त्याने सांगितले. झिराडमध्ये दिलीप भोईर यांच्या सांगण्यावरून हा हल्ला झाल्याचा आरोप अभिलाष पाटील यांनी केला आहे. याबाबत त्यांनी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.झिराड परिसरात खासगी बांधकामे सुरू आहेत. ही बांधकामे तब्बल साडेपाचशे कोटी रुपयांची असल्याची चर्चा आहे. ही सर्व बांधकामे दिलीप भोईर यांनी त्यांच्याकडे आणि त्यांच्या समर्थकांकडे वळविली असल्याने स्थानिक तरुणांनी दिलीप भोईर यांच्या धोरणाविरोधात बॅनरबाजी केली. या तरुणांनी एवढ्यावर न थांबता दिलीप भोईर आणि त्यांच्या सोबतच्या समर्थकांच्या गुंड प्रवृत्तीचा पाढा रायगड जिल्हा पोलीस अधीक्षकांसमोर वाचत त्यांना निवेदन देऊन कारवाईची मागणी केली होती. या सर्व बाबींचा परिणाम झिराड परिसरात झाला. दिलीप भोईर आणि भाजप समर्थक तरुणांनी अभिलाष पाटील याला एकटे गाठून मारहाण केल्याची चर्चा झिराड नाक्यावर रंगली होती.

पद्मदुर्गचा होणार विकास

मंत्रालयीन दालनात मुरुडजवळील पद्मदुर्गच्या पर्यटन विकास आराखड्याबाबत बैठक झाली. बैठकीस नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वित्त विभागाच्या सचिव (वित्तीय सुधारणा) शैला ए, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, भारतीय पुरातत्त्व विभागाचे अधीक्षक पुरातत्वविद डॉ. शुभ मजुमदार, डॉ. अरूण मलिक, पर्यटन संचालनालयाच्या संचालक डॉ. बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी-शर्मा आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. रायगडचे उपजिल्हाधिकारी विठ्ठल इनामदार दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. बैठकीत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, पर्यटकांना पद्मदुर्ग किल्लास्थळी जाण्याकरिता आवश्यक सोयीसुविधांची कामे झाली पाहिजेत. या परिसरात जेट्टी उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यासाठी आवश्यक असणारे ना हरकत प्रमाणपत्र भारतीय पुरातत्व विभागाने तातडीने उपलब्ध करून द्यावे. तसेच किल्ला संवर्धनासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. किल्ल्यावर पर्यटन सुविधा उभारण्याच्यादृष्टीने राज्य शासन आवश्यक सहकार्य करेल. किल्ल्याचे जतन-संवर्धन करण्याच्यादृष्टीने तज्ज्ञ वास्तुविशारदाची नियुक्ती करून आराखडा तयार करण्यात यावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

जाहीर सूचना

याद्वारे जाहीर सूचना दिली जाते की आम्ही डॉ.(श्रीमती) मुरली निलंग देसाई, भारतीय रहिवासी, अपोलो टॉवर, रहेजा अँक्रोपॉलीस, टेलीकॉम फॅक्टरी मागे, देवनार, मुंबई ४०००८८ येथे स्थित, यांच्या खालील अनुसूची मध्ये नमूद केलेल्या सर्व आनुषंगिक तथा प्रासंगिक अधिकारांसह, मालकी हक्काची चौकशी करत आहोत.

जर कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थांनी खाली नमूद केलेल्या मालमत्तेवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर विक्री, हस्तांतरण, गहाण, भेट, धारणाधिकार किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाचे कोणतेही शुल्क, बोजा, हक्क, व्याज किंवा हक्क असल्याचा दावा केला असेल तर त्यांनी अधोस्वाक्षरी करणाऱ्यांना ही सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत, सबळ पुराव्यासह लेखी कळवावे, असे न केल्यास असा कोणताही कथित दावा, व्याज, भार किंवा मागणी माफ केली गेली आहे आणि/किंवा सर्व हेतू आणि उद्देशांसाठी सोडून दिली गेली आहे असे मानले जाईल.

अनुसूची

प्रथमतः

गाव देवतलाई, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित असलेली आणि खालीलप्रमाणे सीमा असलेली सर्व्हे नं. ५/२/ए/१, १-५३-७० एच. ए. मोजमापाच्या जमिनीचा भाग असलेली अंतर्भूत राडारोड्यासह शेतजमिन ०-२३-८ एच.ए आणि ०-०५-८० एच.ए:

पूर्वेकडे	सर्व्हे नं.२२/१/ए/२/३/बी
पश्चिमेकडे	सर्व्हे नं.५/२/ए/१ चा उर्वरीत भाग (भाग)
दक्षिणेकडे	सर्व्हे नं.२७/१/२ (भाग) आणि सर्व्हे नं.२२/१/ए/२/३/बी
उत्तरेकडे	रस्ता आणि सर्व्हे नं. ५/२ (भाग)

दुसरे:

गाव देवतलाई, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित असलेली आणि खालीलप्रमाणे सीमा असलेली सर्व्हे नं. २७/१/२, ०-५३-३ एच. ए. एकूण मोजमापाच्या जमिनीचा भाग असलेली अंतर्भूत राडारोड्यासह शेतजमिन ०-२१-० एच.ए (ॲना थॉमस चाको यांना ०-०५-५० एच. ए.मोजमापाच्या दिलेल्या मार्गाचा समावेशासह):

पूर्वेकडे	सर्व्हे नं.२२/१/ए/२/३/बी
पश्चिमेकडे	सर्व्हे नं.५/२/ए/१ (भाग) आणि सर्व्हे नं.२७/१/२(भाग)
दक्षिणेकडे	सर्व्हे नं.२२/१/ए/२/३/बी, सर्व्हे नं. २४/३, सर्व्हे नं. २७/२ आणि सर्व्हे नं. २७/१/१
उत्तरेकडे	सर्व्हे नं.५/२/ए/१ (भाग) आणि सर्व्हे नं.२७/१/२(भाग)

अधिराज हरीष
डी. एम. हरीष अँड कं.
अँडव्होकेट,
३०५-३०९, नीलकण्ठ, ९८,
मरीन ड्राइव्ह, मुंबई – ४०० ००२
ई-मेल : notice@dmharish.com
दिनांक: ११/०१/२०२४

ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि. रायगड
नोटीस बोर्ड प्रसिद्ध दि. ०९/०१/२०२४
निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा खालील कामाकरीता जास्तीत जास्त नोंदणीकृती, इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच सदरचे निविदा व दरपत्रक दि. १७/०१/२०२४ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय मोर्बा येथे १०.३० वाजेपर्यंत सादर करावे.

अ.क्र.	कामाचे नाव	योजनेचे नाव	अंदाजपत्रक रक्कम	काम पूर्ण करावयाचा कालावधी	१% इसारा रक्कम	कोरे निविदा फॉर्म फी
१	मौजे महादपोली बौद्धवाडी सार्वजनिक विहीर दुरूस्त करणे.	अनुजाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे	७.०० लक्ष	६ महिने	७०००/-	२००/-
२	महादपोली येथे ४ सिटचे सार्वजनिक शौचालय बांधणे	स्वच्छ भारत अभियान	३.०० लक्ष	३ महिने	३०००/-	२००/-

अटी व शर्ती -
१) प्राप्त निविदा दि. १७/१/२४ रोजी ११.०० वाजता ग्रा.पं. मोर्बा येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येतील.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच मोर्बा यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रक्कमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे पदाधिकारी/सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं. ने राखून ठेवला आहे.
४) कामाचे देयकातून शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. काम अंतिमरित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदाराच्या निविदांचा विचार केला जाईल.

सही/-
ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि. रायगड

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि. रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकाकडून कायमचे खरेदीखताद्वारे आमचे अशिलांनी विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमूद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे कोठिंबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू-पै.
श्री. कृष्णकांत गोपाळराव पित्ती	२३	३	०-५३-०	००-३०
श्री. कृष्णकांत गोपाळराव पित्ती	२५	०	०-९४-०	०३-०५
श्री. कृष्णकांत गोपाळराव पित्ती	२४	१	०१-४८-०	०-९५
श्री. कृष्णकांत गोपाळराव पित्ती	२७	३	०-३०-०	०-३०
श्री. कृष्णकांत गोपाळराव पित्ती	२८	२	०१-४८-०	०१-१०
श्री. कृष्णकांत गोपाळराव पित्ती	२६	३	१-३०-०	०१-९५
श्री. कृष्णकांत गोपाळराव पित्ती अपर्णा कृष्णकांत पित्ती	२६	३	१-३

रायगडात 'अवकाळी'ने धास्ती

आंबा, सुपारी, वीटभट्टी व्यावसायिक चिंतेत | रब्बी हंगामाला फटका बसण्याची शक्यता

। चौल । प्रतिनिधी ।

रायगडात मागील दोन दिवसांपासून अवकाळीचे संकट घोंघावत असून, आंबा, सुपारी आणि वीटभट्टी व्यावसायिकांकडून चिंता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, या अवकाळी पावसाचा रब्बी हंगामावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असल्याने बळीरजा धास्तावला आहे.

मागील दोन दिवसांपासून हवामान सातत्याने बदल होत असून, आकाश काळवंडले आहे. त्यामुळे उन्हाळ्यात पावसाळी वातावरण तयार झाले आहे. संपूर्ण राज्यात सोमवारपासून ढगाळ हवामानासह कमी-अधिक अवकाळी पाऊस पडत आहे. रायगड जिल्ह्यातही सोमवारी महाड, मुरुड, रोहा तालुक्यात अवकाळी पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांसह नागरिकांची तारांबळ उडाली. या अवकाळीचा हरभरा, पांढरा कांदा, मूग या रब्बी पिकांसह, भाजीपाला पिके आणि मोहोरात असलेल्या आंबा, काजू बागांना फटका बसण्याची शक्यता आहे.

अवकाळी पावसामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती असल्याने शेतकरी धास्तावले असून, भाताची झोडणी करून हातात येणारे भात घरी घेऊन जाण्याची लगबग सुरू आहे.

> अवकाळीच्या फेऱ्यात दरवर्षी वीटभट्टी व्यावसायिक अडकून पडत आहे. त्यामुळे यापुढे धंदा करायचा तरी कसा असा प्रश्न आम्हा व्यावसायिकांसमोर आहे. आमचे नुकसान झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई आम्हाला मिळत नाही. त्यामुळे धंदा करावा की नाही, असा प्रश्न सतावत आहे.
>
> – महेंद्र घरत, वीटभट्टी व्यावसायिक, चौल

सुपारी व्यावसायिकांची तारांबळ

चौल परिसरात नारळी सुपारीच्या बागा असल्याने व्यावसायिकही मोठ्या संख्येत आहेत. ऑक्टोबरपासून या व्यापारात सुरुवात होते. येथील बागायतदारांकडून असोली सुपारी खरेदी करून तिच्यावर विविध सोपस्कार करून त्यातून रोठा काढण्यात येतो. त्याअगोदर ती सुपारी पाष्टून (सुपारीचे टरफल काढून) महिनाभर सुकवण्यात येते. सध्या लाखभर सुपारी शेतात सुकवण्यासाठी ठेवली आहे. पावसात भिजून नये यासाठी त्यावर प्लास्टिक कापड टाकून ठेवले आहे. सुपारी भिजल्यावर तिला बुरशी येण्याची शक्यता असून ती काळवंडून खराब होण्याची भीती आहे. त्यामुळे मोठा आर्थिक भुर्दंड बसू शकतो, अशी भीती चौल येथील सुपारी व्यावसायिक राकेश पिळणकर यांनी व्यक्त केली.

शेतातील सोनं घरी आणण्याची लगबग

पावसाळी वातावरणामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण असून, शेतातील मळण्या लवकरात लवकर उरकून वर्षभराच्या मेहनतून पिकविलेले सोनं आपल्या घरी आणण्याची लगबग सुरू असल्याचे चित्र शिवारात दिसत आहे.

मुरुडमध्ये शेतकरी चिंतेत

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यात काल रात्री अचानक थंड वाऱ्यासह अवकाळीने जोरदार हजेरी लावल्याने शेतकरी व बागायतदार चिंताग्रस्त झाले असून आंबा बागायतदारांसमोर आंबा टिकवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता भीती निर्माण झाली आहे.

बुधवारी सकाळी वातावरणात बदल होऊन अचानक जोरदार पाऊसाच्या सरी पडल्याने बागायतदारांची चिंतेत वाढ झाली आहे.

आंबा बागायदारांच्या बागेम धील आंबाना चांगला मोहोर येऊन लागला आहे. त्याबरोबर कलिंगड, वालाच्या, चवळीच्या शेंगा चांगला पीक येईल अशी आशा वाटत असतानाच अचानक अवकाळीमुळे शेतकऱ्यांच्या या अशेवर पाणी पेरले आहे. आंबा, कलिंगड, वाल आदींसह पिकांसह अन्य भाज्यांच्या लागवडीला अवकाळीचा फटका बसणार आहे.

ढगाळ वातावरण असेच राहिल्यास मोहोरावर परिणाम होऊन शेती बागायदारांचे नुकसानीत येईल असा अंदाज मुरुड पंचक्रोशी भागातील शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

चिरनेर परिसरात अवकाळीमुळे नुकसान

। चिरनेर । वार्ताहर ।

चिरनेर परिसरात अवकाळी पावसाने मंगळवारी रात्री हजेरी लावल्याने येथील शेतकरी वर्गाबरोबर आंबा बागायतदार वीटभट्टी उत्पादक धास्तावले आहेत. मंगळवारी रात्रीपासूनच पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात पूर्णतः बदल झालेला दिसून येत आहे. गेले चार-पाच दिवस ढगाळ वातावरण या परिसरात दिसून येत होते. अखेर मंगळवारी रात्री हलक्या पावसाच्या सरी बरसल्या. अचानक पाऊस आल्यामुळे वीट भट्टी व्यवसायिक व आंबा उत्पादक बागायतदार चिंता व्यक्त करत आहेत.

आंब्याच्या झाडांना आता कुठे मोहोर लागण्यास सुरुवात झाली आहे. मोहोर बाहेर पडून, फुललेल्या मोहोरवर पाऊस पडल्याने रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच येथील रब्बी हंगामातील वाल, चवळी, मूग, हरभरा आदी कडधान्य पिकांनाही हा पाऊस हानिकारक ठरू शकतो असे येथील कृषीमित्र शेतकरी प्रफुल्ल खारपाटील, गोपीनाथ गोंधळी, अनिल केणी, अरुण केणी, कल्पेश म्हात्रे हरिश्चंद्र गोंधळी यांनी सांगितले. शेतकऱ्यांचे भाजीपाल्याचे मळे या पावसामुळे धोक्यात आले असून, या भाजीपाल्यावरही अवकाळी पावसाचा परिणाम होण्याची दाट शक्यता असल्याचे भाजीपाला उत्पादक शेतकरी कृष्णा म्हात्रे यांनी सांगितले. याशिवाय पशुपालक शेतकऱ्यांनी गुरांसाठी राखून ठेवलेला सुकाचारा (पेंढा) भिजून गेला असल्याचे शेतकऱ्यांकडून समजते.

> तालुक्यात कोणत्याही प्रकारचे फारसे नुकसान झाल्याची तक्रार आमच्या कृषी विभागाकडे अजूनपर्यंत आली नाही.
>
> –सुरज घरत
> कृषी सहाय्यक अधिकारी

माधवी जोशी यांना जिजाऊ पुरस्कार

। पाली /बेणसे । वार्ताहर ।

माँसाहेब जिजाऊ यांची १२ जानेवारी रोजी जयंतीनिमित्ताने ताराराणी ब्रिगेड महाराष्ट्र या संघटनेच्या वतीने समाजातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तुत्ववान महिलांचा जिजाऊ पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करीत आपल्या कार्यकर्तृत्वाचा प्रभाव उमटविणाऱ्या समाजसेविका माधवी जोशी यांना पाचाड येथे माँसाहेब जिजाऊंच्या नावे पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास हजारोच्या संख्येने शिवप्रेमींनी उपस्थित राहून ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हा असे आवाहन ताराराणी ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा शिवमती वंदना मोरे यांनी केले आहे.

● अवकाळीमुळे नवीन पनवेलमध्ये खोदलेले रस्ता चिखलमय झाला आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)

● पनवेल तालुका सहकारी भात गिरणीमध्ये अवकाळीमुळे भात भिजू नये म्हणून प्लॉस्टिक कव्हर टाकण्यात आले. (छायाचित्र : राजेश डांगळे)

अतिक्रमणाकडे पेण नगरपालिकेचे दुर्लक्ष

जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागणार असल्याचा इशारा

। पेण । प्रतिनिधी ।

पेण शहरात बाजारपेठेपासून अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले आहे. या अतिक्रमणामुळे सर्वसामान्यांना प्रचंड त्रास होत आहे. याबाबत लेखी तक्रार करूनदेखील पेण नगरपालिका प्रशासन दुर्लक्ष करीत आहेत. अतिक्रमण करणाऱ्या दुकानदारांमुळे होणाऱ्या समस्यांकडे नगरपालिकेने गांभीर्याने लक्ष न दिल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडे गाऱ्हाणे मांडणार असा इशारा काही दुकानदारांनी दिला आहे.

नगरपालिका कर्मचाऱ्यांचे आणि दुकानदारांचे साठेलोटे असावे असे बोलले जात आहे. कोतवाल चौकापासून सुभाष कॉर्नरपर्यंत निम्याहुन जास्त दुकानदारांनी दुकानाच्या बाहेर मोठया प्रमाणात दुकानाचा पसारा वाढवलेला पहायला मिळतो. अथवा दुकानाच्या दारात भाजी विक्रेत्यांना दरमहा भाडयाने जागा वापरायला दिलेली पहायला मिळते. यामुळे प्रामाणिक दुकानदारांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे.

दुकानदारांनी नगरपालिकेकडे रितसर लेखी तक्रार केली आहे. परंतु नगरपालिका प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे काही दुकानदारांचे म्हणणे आहे. लाल बहादुर शास्त्री मार्गावरील गणपती मंदिरा समोरून इस्त्रायल आळीत जाण्याच्या मार्गावर तर भाजी विक्रेत्यांनी निम्याहुन जास्त मार्ग अडवून बिनधास्तपणे आपला दुकान थाटला आहे, त्यामुळे रात्रीच्या वेळी प्रशस्त वाटणारा मार्ग सकाळी ८:३० नंतर दाटीवाटीची गल्ली वाटते.

याविषयी ज्येष्ठ नागरिकांनी देखील वेळोवेळी लेखी निवेदन दिली आहेत. त्यांना देखील केराची टोपली दाखविली जात आहे. वेळेस रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या दुकानदारांवर नगरपालिका प्रशासनाने लगाम न घातल्यास ज्या दुकानदारांवर अतिक्रमण करणाऱ्या दुकानदारांमुळे त्रास होत आहे ते दुकानदार जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन आपली कैफीयत मांडणार असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधींना दुकानदारांकडून मिळाली आहे.

एक धाव प्रदूषणमुक्तीसाठी

। पनवेल । वार्ताहर ।

तळोजा एमआयडीसीतून रात्री हवेत सोडणाऱ्या वायूंमुळे तळोजा परिसरात प्रदूषण वाढले आहे. याविरोधात विविध स्तरांवर तळोजावासी लढा देत आहेत. याच अनुषंगाने मएक धाव प्रदूषण मुक्तीसाठीचा संदेश देणारी मॅरेथॉन रविवार (दि.२८) होणार आहे.

यामध्ये शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, रहिवासी, सामाजिक संस्था, महिला, युवक मंडळे, परिसरातील गावे आणि प्रदूषणाविरोधात लढा देणारे नागरिक मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहेत. तळोजा औद्योगिक क्षेत्रातून रात्रीच्या वेळी सोडण्यात येणाऱ्या केमिकलच्या उग्र वासामुळे खारघर, रोडपाली, कळंबोली आणि कामोठेतील रहिवाशांची अनेक वेळा मोर्चे-आंदोलने झाली; मात्र शासनाकडून कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना झालेल्या नाहीत. त्यामुळे प्रदूषणाविरोधात खारघर, रोडपाली, कळंबोली परिसरातील काही सामाजिक कार्यकर्ते लढा देत आहेत. दरम्यान, तळोजा वसाहतीची वाढती लोकसंख्या आणि रात्रीच्या वेळी होणाऱ्या प्रदूषणामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांना सकाळी घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. वायुप्रदूषणाच्या वाढत्या त्रासामुळे तळोजाकरांनी लढा तीव्र करण्याचा संकल्प केला आहे. या लढ्याची सुरुवात तळोजा वसाहत मॅरेथॉनने होणार आहे.

आरोग्य शिबीरातून रुग्णांना आधार

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामार्फत विशेषज्ञ आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. माणगाव तालुक्यातील लोणारे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठात गुरुवारी (दि.५) झालेल्या या शिबीराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. वेगवेगळ्या आजारांची तपासणी यावेळी करण्यात आली. त्यामुळे या शिबीरातून रुग्णांना आधार मिळाला आहे.

नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा प्रदान करणे, महाराष्ट्र शासनाच्या सहा आरोग्य अभियानाविषयी जनजागृती निर्माण करणे हे मुळ उद्दीष्ट होते. या शिबीरात अलिबाग येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विशेषज्ञ डॉक्टर पथक सहभागी झाले होते. एकूण १८७ रुग्णांचे निदान व उपचार या शिबिरामध्ये करण्यात आले. त्यात २१ रुग्णांना मधुमेह व २६ रुग्णांना उच्च रक्तदाब झाल्याचे आढळून आले. या रुग्णांची संपुर्ण तपासणी करून त्यांच्यावर औषध उपचार करण्यात आले.मिशन अवयव दान अंतर्गत लोकांना समुपदेशन करून अवयव दान करण्यास प्रवृत्त करण्यात आले. यावेळी सहा जणांनी अवयव दान करण्यासाठी अर्ज दाखल केले. रुग्णांना चांगली सेवा देण्याच्या उद्देशाने राबविलेल्या या उपक्रमात वेगवेगळ्या अधिकाऱ्यांनी भेट दिली. त्यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांचे त्यांच्याकडून कौतुक करण्यात आले.

मुंबईला तिसरा डबा

मुंबईत पूर्वी लोकल गाड्यांना नऊ डबे असत. मग बारा डब्यांच्या गाड्या सुरू झाल्या. डब्यांची संख्या वाढली तरी बहुतेक रेल्वे स्टेशनचे फलाट जुनेच म्हणजे कमी लांबीचे होते. मग काही दिवस गाड्या दोनदा थांबवाव्या लागत. आधी पुढचे डबे फलाटाला लागत. नंतर गाडी पुढे घेऊन उरलेल्या डब्यातली माणसे फलाटावर उतरू शकत. आता पंधरा डब्यांच्या गाड्यांची मागणी होते आहे. भविष्यात ती २१ डब्यांचीही होईल. मुंबईतल्या रेल्वेलाच नव्हे तर या शहरालाही सतत असे नवनवे डबे जोडणे चालू असते. १९७० च्या दशकात नवी मुंबईचा दुसरा डबा तिला जोडला गेला. त्यामुळे मुख्य शहरातली गर्दी कमी होईल असे सर्वांना वाटले. प्रत्यक्षात तसे काहीच घडले नाही. आज पालघरपासून खोपोलीपर्यंत आणि कसाऱ्यापासून पेणपर्यंत मुंबई पसरतच चालली आहे. आता तिला तिसऱ्या मुंबईचा आणखी एक डबा जोडण्याचे चालू आहे. शिवडी-न्हावा सागरी पूल लवकरच खुला होईल. त्याच्या आजूबाजूला तिसरी मुंबई वसवण्याच्या प्रकल्पाला राज्य सरकारने मान्यता दिल्याच्या बातम्या आहेत. उलवे, उरण, पेण, पनवेल, कर्जत या भागातील ३२३ चौरस किलोमीटर पट्टयात हे नवे शहर वसवले जाईल. यासाठी १२४ गावांमधील जमीन मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत संपादित केली जाईल असे या बातम्यांमध्ये म्हटले आहे. विशेष म्हणजे यासाठी नैना प्रकल्पातील ७७ गावे तेथून वगळून तिसऱ्या मुंबईत समाविष्ट केली जातील. शिवाय खोपटा नवे शहरमधील ३३ गावेही त्यात असतील. नवी मुंबईच्या विकासाची जबाबदारी ज्याप्रमाणे सिडकोवर देण्यात आली होती त्याप्रमाणे मुंबईला नवा डबा जोडण्याचे काम न्यू टाऊन डेव्हलपमेंट ऑथॅरिटी किंवा नवनगर विकास प्राधिकरण नावाच्या संस्थेकडे सोपवले जाईल. गावांची संख्या भविष्यात दोनशेपर्यंत जाईल असाही एक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

रायगडवर परिणाम

गेल्या काही वर्षात मुंबईचा विकास व विस्तार यांचा सर्वाधिक परिणाम रायगड जिल्ह्यावर झाला आहे. मुंबईच्या विस्ताराच्या पहिल्या टप्प्यात सुमारे सत्तर वर्षांपूर्वी हीच स्थिती ठाणे जिल्हयाची झाली. त्यावेळी डोंबिवली, कल्याण ते कसारा आणि इकडे बोरीवली ते पालघर (तेव्हा तो स्वतंत्र जिल्हा नव्हता) हा पट्टा मुंबईत ओढला गेला. नवी मुंबई वसवली जाण्याच्या काळात मुंबईच्या विकासाने रायगड जिल्ह्यात हातपाय पसरले. पनवेल हे मुंबईचे उपनगर बनले. तिकडे कर्जत व खोपोलीपर्यंत लोकल जाऊ लागल्याने तीदेखील मुंबईशी अधिक जोडली गेली. आता तिसरा डबा किंवा तिसरी मुंबई वसवताना उत्तर रायगडचा बराचसा भाग मुंबईत विलीन होणार आहे. उरणपर्यंत रेल्वे पोचल्यानंतर आणि शिवडीला रस्तेमार्गाने जोडले गेल्याने हे होणारच होते. पण आता तिसऱ्या मुंबईच्या रुपाने हा विकास अधिक नियोजनपूर्वक होणार आहे. याचे चांगले आणि वाईट असे दोन्ही परिणाम आहेत. विकासाच्या पहिल्या टप्प्यात रेल्वेने गावे जोडत गेली तसतशी तेथील वस्ती वाढत गेली. मात्र त्यावर सरकारचे कोणतेच नियंत्रण नव्हते. तेव्हाच्या सरकारने तशी दृष्टीही ठेवली नव्हती. ठाण्याच्या पुढची कळवा, दिवा, डोंबिवली, कल्याण इत्यादी अनेक रेल्वे स्टेशन्स व तेथे झालेला विकास हा या नियोजनशून्यतेची साक्ष देतो. या सर्व इलाख्यांमध्ये वाटेल तशी बांधकामे झाली आहेत. रस्त्यांची नीट सोय नाही. त्यामुळे बहुतांश भाग कमालीच्या गर्दीचे, घाणीने भरलेले व सदैव वाहतूक कोंडीत अडकलेले असे दिसतात. नवी मुंबई वसवताना हे सर्व टाळण्याचा प्रयत्न केला गेला. तेथील रस्ते, घरबांधणी ही अधिक सुनियोजित होती. पाण्याची सोयही बरी होती. याच धर्तीवर आता तिसऱ्या मुंबईतील प्रस्तावित प्रदेशाचा विकास होणार असेल तर त्याचे स्वागत करायला हवे. एवीतेवी या भागांचे नागरीकरण होणे हे टळणारे नाहीच. तर मग ते अधिक शिस्तबद्ध रीतीने झाले तर सर्वांच्याच फायद्याचे ठरू शकते.

रक्त सांडायला लावू नका

मात्र याला दुसरीही बाजू आहे. या विकासातून स्थानिक जनतेला नक्की काय व किती लाभ होणार हा यातला कळीचा मुद्दा आहे. आज या भागात राहणाऱ्यांकडे जमिनी हे त्यांचे एकमेव भांडवल आहे. अनेकांकडे तर तेही नाही. नव्या रचनेत त्या सर्वांना कसे सामावले जाणार याची स्पष्ट घोषणा सरकारने सुरुवातीलाच करायला हवी. रायगड जिल्ह्यातील जनतेला आजवर फार कटू अनुभव आले आहेत. सेझ, महासेझ, रेल्वे, रिलायन्स, गेल, जेएसडब्ल्यू, अलिबाग-विरार मार्ग अशा विविध नावाखाली या भागातील शेकडो एकर जमिनी संपादित केली गेली आहे वा तशी टांगती तलवार येथील जनतेच्या डोक्यावर आहे. अनेकदा नागरिकांचा प्रकल्पांनाही विरोध नसतो. मात्र त्यांच्या जमिनींचा मोबदला त्यांना किती दिला जाणार हे कधीही स्पष्टपणे सांगितले जात नाही. काही प्रकल्पांमध्ये मोबदल्याची रक्कम जाहीरही होते. पण ती हमखासपणे इतकी तुटपुंजी असते की, नागरिकांना प्रत्येक पावलाला संघर्ष करावा लागतो. वास्तविक नवीन जमीन अधिग्रहण कायद्यानुसार रस्ते इत्यादी लोककल्याणाच्या प्रकल्पांसाठी जमिनी संपादन केल्या तरीही घसघशीत मोबदला द्यावा लागतो. तिसरी मुंबईसारखे प्रकल्प तर सरळसरळ व्यापारी स्वरुपाचे असतात. त्यातून सरकार, खासगी कंपन्या, बिल्डर इत्यादींना प्रचंड फायदा होणार असतो. उदाहरणार्थ तिसऱ्या मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलाच्या धर्तीवर एक व्यापारी केंद्र वसवले जाणार आहे. तेथील इमारतीच्या किमतींची केवळ कल्पना करता येण्यासारखी आहे. अशा स्थितीत या विकासाचा व पैशांच्या उलाढालीचा स्थानिक नागरिकांना पुरेपूर लाभ व्हायला हवा. शिवाय, त्यांना एकदाच मोठी रक्कम नव्हे तर दीर्घ काळासाठी उत्पन्न मिळत राहील अशी तरतूद त्यातून केली जायला हवी. दुर्दैवाने, अशा प्रकल्पांचे विकासक खासगी असो की सरकारी ते स्थानिकांना पिळून कसे घेता येईल व कमीत कमी रकमेत जमिनी कशा लाटता येतील हेच पाहतात. मग आंदोलने सुरू होतात व स्थानिकांना न्यायासाठी घाम आणि रक्त सांडावे लागते. मुंबईला नवा डबा जोडताना तरी हे टळावे.

विचार

वि.स. खांडेकर लेखक आणि व्यक्ती

मराठीला पहिले ज्ञानपीठ मिळवून देणारे, मागच्या शतकातले विख्यात लेखक वि.स. खांडेकर यांची ११ जानेवारी २०२४ रोजी एकशेपंचविसावी जयंती आहे. कथा, पटकथा, कादंबऱ्या, नाटके, ललितलेख, निबंध, समीक्षा अशा विविध साहित्यप्रकारांमध्ये खाडेकरांच्या नावावर पंचाहत्तरपेक्षा जास्त लेखनकृती आहेत. ते स्वातंत्र्यलढ्यातल्या ध्येयवादी प्रवृत्तीचे आणि स्वातंत्र्यानंतरच्या नवनिर्माणाच्या आकांक्षांचे उद्गाते होते. आदर्शवादी विचारसरणी आणि मानवी जीवनावरची श्रद्धा यांचा लेखनातला ललितरम्य आविष्कार या गुणांमुळे त्यांच्या लेखनाचा खास त्यांचा असा चाहतावर्ग होता. समाजाची मूल्यव्यवस्था बदलत गेली तसा त्यांचा वाचकवर्ग कमी झाला. तरी आजही 'अमृतवेल', 'उल्का', 'ययाती', 'क्रौंचवध' या कादंबऱ्यांना वाचक आहेत. त्यांनी ज्या आदर्श मूल्यांचा, समतेचा आणि माणूसकीचा त्यांच्या लिखाणातून पाठपुरावा केला ती मूल्ये शाश्वत आहेत. खांडेकरांच्या एकशेपंचविसाव्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या पत्रलेखनाविषयी काही आठवणी सांगत आहेत, खांडेकरांच्या अखेरच्या काळात त्यांचे लेखनिक राहिलेले राम देशपांडे.

राम देशपांडे

वि.स. खांडेकर यांचा जन्म ११ जानेवारी १८९८ रोजी झाला आणि त्यांचे २ सप्टेंबर १९७६ रोजी वयाच्या अठ्याहत्तराव्या वर्षी निधन झाले. २०२३ मध्ये सुरू झालेले त्यांच्या एकशेपंचविसाव्या जयंतीचे वर्ष ११ जानेवारी २०२४ रोजी संपेल. मला त्यांच्या अखेरच्या कालखंडात म्हणजे अखेरच्या आठ-नऊ वर्षांच्या काळात त्यांचा सहवास लाभला. मी या काळात त्यांचा लेखनिक होतो तरी त्यांच्या कुटुंबातील-परिवारातील एक सदस्य झालो होतो. साहजिकच त्यांचे सर्व लेखन प्रकार- कथा, कादंबरी, आत्मकथा, रुपककथा, प्रस्तावना आणि त्यांचा दैनंदिन पत्रव्यवहार मला जवळून पाहण्यास मिळाले. आज जेव्हा मी त्यांच्या या सर्व लेखनपसाऱ्याकडे तटस्थपणे पाहतो तेव्हा एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे खांडेकरांचे पत्रलेखन. त्यांच्या पत्रलेखनातून त्यांचे भावजीवन, सर्वसामान्यांविषयीचा जिव्हाळा, आपुलकी या गोष्टी जाणवतात. ते एक आगळावेगळा मार्गदर्शक होते आणि मार्गदर्शन करत असताना स्वत:च्या जीवनाकडेही मर्यादांचे भान ठेवून, तटस्थपणाने पाहणारे स्थितप्रज्ञ होते.

एक घटना यानिमित्ताने आठवते ती म्हणजे एका सकाळी, त्यांनी सांगितलेला मजकूर लिहून घेताना मला जाणवलेले खांडेकरांचे वेगळेपण ! त्याचे झाले असे आदल्या दिवशी आलेली पत्रे उत्तरासाठी क्रमवारीने लावून ठेवलेली होती. त्यात पुणे जिल्ह्यातील एका छोट्याशा खेड्यात शिकणाऱ्या मुलीचे एक पत्र होते. ती तिच्या परीने तिची वाचनाची भूक-आवड भागवून घेत होती. तिने खांडेकर यांच्या सर्व कादंबऱ्या वाचल्याचे तिच्या त्या सुंदर अक्षरातील पत्रांतून जाणवत होते. मी त्या पत्राचे वर्णन भाऊंना सांगितले आणि तिचे पत्र अनुत्तरित राहू नये म्हणून ते पत्र उत्तरासाठी आधी लिहण्यास घेतले. पत्र आधी वाचून घेतले असल्याने उत्तर काय पाठवावे याचा विचार त्यांनी निश्चित आधी केला असावा.

तर त्या मुलीच्या पत्राला पोस्टकार्डावर उत्तर लिहिताना ते म्हणतात, ''तू वाचनाविषयी लिहिलंस पण एक गोष्ट लक्षात ठेव. वाचन विरंगुळा म्हणून चांगला असला तरी आपल्या दैनंदिन जीवनाचा अडसर ठरू नये. तुझी अभ्यासातील प्रगती कळली. भरपूर शीक आणि एक गोष्ट- आपला भार- आईवडिलांवरील कमी कसा करता येईल याचा आधी विचार कर, आता तुम्हा मुलींना अनेक क्षेत्रे खुणावत आहेत. तू पत्रात माझ्या लेखनाविषयी आपुलकीने आदराने लिहिले आहेस, पण एक गोष्ट लक्षात ठेव. भावी काळ माझी किंमत चिल्लर नाण्यांत करणार आहे. बंद्या रुपयात करणार नाही.'' हे लिहित असताना आवर्जून तुझ्या आईबाबांना माझा नमस्कार सांग असेही लिहिले होते.

त्या वेळी त्यांना पूर्णपणाने अंधत्व आले होते आणि तशाही स्थितीत ते जीवनाकडे तटस्थपणाने पाहत होते. आणि तो तटस्थपणाचा अनुभव त्यांच्या त्या उत्तरातून मला जाणवत होता. उत्तर पोस्टकार्डावर लिहिले होते. येथे भाऊंचे वेगळेपण जे मला जाणवले ते सांगायचा मोह झाल्याशिवाय राहत नाही. ते उत्तरे पाठवण्याबाबत जसे जागरूक होते तसेच कोणता मजकूर कार्डावर लिहायचा, कोणता आंतर्देशीय पत्रावर आणि कोणता मजकूर लेटरहेड वापरून लिहायचा याविषयी जागरूक असत. साधे डिंकाचे उदाहरण घ्यायचे तर नऊ-दहा वर्षे मी लेखनिक म्हणून काम करत होतो. त्या नऊ-दहा वर्षांच्या काळात कधीही डिंकाची ट्यूब आणली नाही. किराणा दुकानातून कोरडा डिंक आणायचा आणि तो एका बाटलीत (तीही रूंद तोंडाची) पाण्यात भिजवून वापरण्यासाठी डिंक तयार करायचा असा शिरस्ता होता.

त्यांचे दुसरे एक पत्र असेच थोड्याशा वेगळ्या नजरेतून. एका संपादिकेचे पत्र होते. पत्रात दिवाळी अंकासाठी लेखन पाठवण्याची विनंती केली होती. पहिले पत्र आले, त्याला उत्तर पाठवताना भाऊंनी लिहिले होते, की 'सध्या माझी प्रकृती बरी नाही. ब्राँकायटिसचा त्रास होतो आहे. प्रकृतीत थोडीफार सुधारणा झाली तर आणि हातून काही लिहून झाले तर अवश्य पाठवीन.' हा खरंतर सभ्य शब्दात कळवलेला नकार होता पण या उत्तराचा अर्थ लक्षात न घेता त्या बाईंनी सतत स्मरणपत्रे पाठवायला सुरुवात केली. पहिल्या दोन-चार पत्रांना उत्तर द्यावे असे काही भाऊंना वाटले नाही. पण नंतर जे पत्र आले ते मात्र आता उत्तर द्यायलाच हवे असे त्यांना वाटले. त्या पत्रात, त्या संपादिकेने लिहिताना म्हटले, की तुमच्यासारख्या लेखकांना जात्यावर बसलात की ओवी सहज सुचेल. त्यांनी एवढ्या एका वाक्याचा संदर्भ घेऊन लिहिले- 'पत्र मिळाले. मजकूर आणि त्यातला सूचनावजा मजकूर समजला. जात्यावर बसायला कंबर घट्ट असावी लागते आणि जाते ओढायला मनगटात बळही असावे लागते. मी त्या दोन्हीचा अभाव असल्याने लिहू शकत नाही.'

मोजक्या शब्दात मनोगत व्यक्त करणे ही भाऊंची खासियत होती. पाल्हाळ हा प्रकार नव्हता. त्यांनी स्वतः च्या प्रकृतीचे रडगाणे पत्रातून गाऊन कधी सहानुभूती मिळवली नाही. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे हा तर त्यांचा अतिशय आवडता भाग. मात्र ते करत असताना त्यांनी भावी जीवनातले धोक्याचे कंदील दाखवायला कधी कमी केले नाही.

एक पत्र मला आठवले, त्यांच्या एका अगदी जवळच्या स्नेह्याचे भले मोठे आंतर्देशीय पत्र आले. त्या पत्रात त्यांनी त्यांच्या व्यथा, वेदना, भोवतालची परिस्थिती, बहकत चाललेली आणि मागचा पुढचा विचार न करणारी पिढी याविषयी लिहून मन मोकळे केले होते. ते पत्र अनुत्तरीत राहू नये म्हणून भाऊंनी उत्तर सांगितले, तेही कार्डावरच! ते लिहितात 'पत्र वाचले. तुमची व्यथा समजली. तुम्ही साठी ओलांडली आहे आणि आता एक गोष्ट सर्वांनी; विशेषतः साठी उलटून गेलेल्या व्यक्तींनी कायम ध्यानात ठेवा. आता साठी उलटल्यावर आपण नटाची भूमिका न करता प्रेक्षकाची भूमिका करायला हवी. पिढ्यापिढ्यांत दरी पडली आहे. ती यापुढे सतत वाढत जाणारी आहे. अशावेळी आपण प्रेक्षक व्हायचे नट नाही.'

वि.स. खांडेकर यांचे तरुणांना आवाहन

सव्विसावे साहित्य संमेलन

एक पत्र मोठे गमतीदार होते. त्याने पत्रात लेखनाविषयी भाऊंकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करताना लेखनाविषयी काही प्रश्न विचारले. त्याला भाऊंनी उत्तर लिहिताना सांगितले, की तुमची लेखनाची वाट तुम्हीच शोधायला हवी. येथे मार्गदर्शक उपयोगी पडतो पण त्याची भूमिका मर्यादित असते. उत्तराच्या शेवटी त्यांना स्वतः च्याच एका कवितेची ओळ लिहिली की 'वाट असते ज्याची त्याची, ज्याने त्याने चालायाची.' त्यांना प्रत्यक्ष भेटायला येणाऱ्या व्यक्तींनाही ते आवर्जून भेटायचे. एकदा असेच साठी उलटून गेलेले आणि त्यांच्या लेखनाविषयी अपार प्रेम, आदर असलेले एक जोडपे आले होते. गप्पागोष्टी झाल्या. ते जोडपे अतिशय हळवे होते. भाऊंना अंधत्व आल्याचे पाहून त्यांचे डोळे भरून आल्याचे जाणवले. त्या दोघांच्या आवाजातल्या कंपावरून भाऊंनी ते जाणले. त्या जोडप्याची समजूत काढताना म्हणाले, 'अहो, ती हेलन केलर मुकी, बहिरी आणि अंध होती. तिच्या मानाने मी मुका नाही, बहिरा नाही, फक्त अंध आहे. म्हणजे तिच्यापेक्षा मी सुखी नाही का?' त्यांनी लिहिलेले प्रत्येक पत्र असे काही ना काही सांगून जात असे. म्हणूनच मला वाटते, की भाऊंच्या पत्र लेखनातून दिसून येणारे त्यांचे चिंतन, जीवनविचार वाचकांसमोर येण्याची नितांत गरज आहे.

आजकाल

इतिहासाच्या अडगळीत पडून असलेल्या फातिमा

पैंगबर शेख

मंगळवारी ज्ञानजोती फातिमा शेख यांची १९२ वी जयंती. बऱ्याच ठिकाणी आज ती साजरी झाली याचा आनंद आहे. इतिहासाच्या अडगळीत पडून असलेलं एक ऐतिहासिक व्यक्तिमत्व हळू हळू समाजाच्या समोर येत आहे. क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या आयुष्यात काही मुस्लिमांचे अनन्यसाधारण योगदान राहिले आहे. त्यापैकी पहिले व्यक्ती म्हणजे मुन्शी गफ्फार बेग ज्यांनी महात्मा फुलेंची २ वर्ष बंद असलेली शाळा पुन्हा सुरू करण्यासाठी गोविंदराव फुले यांच्याकडे आग्रह केला. यासाठी ख्रिश्चन धर्माचे धर्मोपदेशक लिजिट साहेब यांनीही प्रयत्न केला हे देखील इथे नमूद करायलाच हवे.

महात्मा फुलेंच्या आयुष्यात योगदान दिलेले दुसरे महत्वाचे मुस्लिम व्यक्तिमत्त्व म्हणजे गंज पेठ मध्ये राहणारे उस्मान शेख. याबाबत एक प्रसंग महत्वाचा आहे तो म्हणजे ज्यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या शेण चिखल फेकण्याची घटना घडली त्यावेळी ही गोष्ट त्यांचे सासरे म्हणजे गोविंदराव फुले यांना समजली. आधीच पुण्यातील ब्राह्मण वर्गाने महात्मा फुलेंनी बहुजन आणि महिला शिक्षणाचे उद्योग बंद करावे असा तगादा गोविंदराव फुले यांच्याकडे लावला होता. त्यातच हा प्रकार घडल्याने गोविंदराव फुले यांनी महात्मा फुलेंना या कार्यात माझ्या सुनेला ओढायचे नाही असा दम दिला अन्यथा हे घर आत्ताच्या आत्ता सोडुन जावे असे सांगितले. महात्मा फुलेंनी आणि त्यांच्या सदैव पाठीराख्या असणाऱ्या सावित्रीबाई फुले या दोघांनीही तत्क्षणी घर सोडण्याचा निर्णय घेतला.

उस्मान शेख ही तीच व्यक्ती आहे ज्यांनी महात्मा फुलेंना घरातून काढल्यावर त्यांना आपल्या घरात आसरा दिला आणि एवढ्यावरच न थांबता आपली बहीण फातिमा शेख यांनाही या शिक्षणकार्यात समाविष्ट होण्यास प्रेरित केले. यातूनच देशातील पहिल्या मुस्लिम शिक्षिकेचा उदय झाला तो म्हणजे ज्ञानजोती फातिमा शेख. उस्मान शेख यांच्या घरातून देखील त्यावेळी शिक्षणाचे धडे दिले गेले. एवढंच नाही तर महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या शाळेमध्ये देखील फातेमा शेख यांनी बहुजन विद्यार्थ्यांना आणि मुलींना शिक्षण दिले.

इतिहासाच्या अडगळीत हे व्यक्तिमत्त्व कित्येक दशके पडून होते. फक्त हे एकच व्यक्तिमत्व असे होते काय ? तर नाही. क्रांतिगुरु लहुजी वस्ताद यांचेही महात्मा फुलेंच्या आयुष्यातील योगदान हे कित्येक दशके अडगळीत पडून होते. हा इतिहास जर लहुजी वास्तदांच्या पाईकां पर्यंत पोहोचला तर मी गॅरंटी देतो ते मनुवाद्यांच्या विळख्यातून सहज बाहेर निघतील. पण ते निघू नये म्हणून हा इतिहास पोहोचवला गेला नाही. आज ज्ञानजोती फातिमा शेख यांच्या इतिहासावर आक्षेप घेणारे दिड दमडीचे घुमे ज्यावेळी शिवाजी महाराजांचे गुरू दादोजी कोंडदेव सांगितले जात होते त्यावेळी मूग गिळून गप्प होते. मग ज्यावेळी खरा इतिहास समोर आला तर पुण्यातील लाल महालातला पुतळा हलवलाच ना? गेली तीन शतके हा खोटा इतिहास सांगून लोकांना मूर्खात काढायचे काम ज्यांनी केले तेच आज फातिमा शेख यांच्या इतिहासावर आक्षेप घेत आहेत. अशी अनेक उदाहरणे माझ्याकडे आहेत. ज्यांना माईक घेऊन कुठेतरी चर्चेत बोलण्याची खुमखुमी आहे त्यांनी जरा माझ्याशी बोलावे.

बर, हा विषय एव्हढाच आहे का ? तर नाही. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि ज्ञानजोती फातिमा शेख यांचा एक आजूबाजूला बसलेला फोटो आहे तर तो फोटो क्रॉप करून मागील एका महिलेचा आणि सावित्रीबाई फुले या दोघांचाच फोटो क्रॉप करून एका इस्लामिक स्कॉलर म्हणवणाऱ्या मनोरुग्ण गृहस्थाने बुरख्या मधून क्रांती होते अशी पोष्ट लिहिली आणि ती पोष्ट काही मूर्ख मुस्लिमांनी लाईक आणि शेअर देखील केली.

अरे घुम्या, तुझ्या त्या बुरख्याचा आणि ज्ञानजोती फातिमा शेख यांचा काडीचाही संबंध नाही. तो बुरखा तू घे आणि घाल. आणि कसली क्रांती करायची ती कर. तुम्हाला टिपू सुलतान यांना बळेच दाढी लावायची असते ज्ञानजोती फातिमा शेख यांना बळेच बुरखा घालायचा असतो. फातिमा शेख या साडी आणि डोक्यावर पदर ठेऊन पण मुस्लिमच होत्या. आम्ही खूप संयमी आहोत असे दाखवताना असले छपरी उद्योग करणे बंद करावे अशा मनोरुग्ण व्यक्तींनी.

असो, भारतातील पहिल्या मुस्लिम शिक्षिका ज्ञानजोती फातिमा शेख यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन. फातिमा शेख या इतिहासातील एक अडगळीत पडलेले खरे खुरे पान आहे. आत्ता कुठे त्यांच्यावर थोडे फार संशोधन होत आहे. पुढेही आणखीन होत राहील. नवनवीन इतिहासाच्या बाजू समजतील. यासाठी आम्हीही प्रयत्न करूच. पण डोके भानावर ठेऊन. जे आहे ते दाखवू जे नाही ते नाहीच म्हणू... समजलं तर ठीक.

लोकसंसद

भरती परीक्षेला पेपरफुटीचा शाप

राज्यात मागील काही काळात म्हाडा भरती परीक्षा, आरोग्य विभागाच्या 'ड गट' संवर्गातील पदभरती, मुंबई पोलीस भरती, महाजनको भरती अशा अनेक पदभरती स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटले असल्याचे समोर आले होते. त्यानंतरही पेपरफुटीची मालिका थांबली नाही. काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या तलाठी भरती परीक्षेत पेपरफुटी झाल्याचे आरोप होत असतानाच नुकताच या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. तलाठी पदाच्या एकूण ४४६६ जागांसाठी एकूण ८ लाख ६३ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. या परीक्षेत ४८ विद्यार्थ्यांना २०० गुणांची परीक्षा असताना २०० गुणांपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत आणि येथेच वादाची ठिणगी पडली आहे. परीक्षा पारदर्शक पद्धतीने पार पडली नसून ही परीक्षा रद्द करावी आणि पुन्हा नव्याने घ्यावी अशी मागणी काही उमेदवारांकडून होत आहे. तर शासनाकडून, ५७ प्रश्नपत्रिकांची काठिण्य पातळी विचारात घेऊन उमेदवारांनी मिळवलेल्या उत्तरांच्या गुणांवर सामान्यीकरण प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्यामुळे काही उमेदवारांचे गुण हे एकूण गुणांपेक्षा जास्त झाल्याचे सांगण्यात आले. या परीक्षेत नक्की घोटाळा काय झाला हे यथावकाश पुढे येईलच. एक मात्र नक्की राज्यात कोणतीही सरकारी पदभरती परीक्षा असो आणि ती एमपीएससी किंवा टीसीएस अशा कोणत्याही संस्थेने पार पाडोत या परीक्षांना पेपरफुटीचे गालबोट लागल्याचे समोर आले आहे.

-प्रदीप शंकर मोरे

मराठी साहित्यिक दिनविशेष

अकरा जानेवारी

१८९८ :- 'ज्ञानपीठ' पुरस्काराचे मराठीतील पहिलेच मानकरी, जीवनवादी साहित्यप्रवाह सशक्त करणारे लेखक विष्णू सखाराम (वि.स) खांडेकर यांचा जन्म. १५ कादंबऱ्या, ३१ कथासंग्रह, लघुनिबंधाचे १० संग्रह, ६ रुपककथा, एक नाटक आणि १८ चित्रपटांच्या कथा लिहिल्या. 'ययाति' या त्यांच्या कांदबरीला १९७४ मध्ये ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. याच कादंबरीला १९६० सालचा साहित्य अकादमी पुरस्कारही मिळाला होता. खांडेकर यांचे देहावसान २ सप्टेंबर रोजी झाले. **१९१५ :-** मराठीतील उपहासकाव्याचे जनक गंगाधर रामचंद्र मोगरे यांचे निधन. 'मोगऱ्याची फुले','महाराज जनविलास' या नावाखाली पाच गुच्छातून त्यांच्या कविता प्रसिध्द. याशिवाय मोगऱ्यांनी आनंदीबाई जोशी, विष्णूशास्त्री चिपळूणकर, तुकोजीराव होळकर, जियाजीराव शिंदे अशा अनेक व्यक्ती त्यांच्या विलापिकांचे विषय झाल्या आहेत. 'पदवीचा पाडवा' मिळून तीन उपहासोक्तीपूर्ण दीर्घ काव्ये, 'विजयिनी- विजयाष्टक' हे व्हिक्टोरिया राणीचा हीरक जयंती निमित्त रचलेले काव्ये तसेच देशाभिमानी वृत्तेचे दर्शन घडवणारे सह्याद्री हे काव्यही त्यांचे उल्लेखनिय आहे. **१९२०** :- लेखक, पत्रकार कृष्णाजी काशीनाथ फडके उर्फ तात्या यांचे निधन. 'हिंदूपंच' करीता त्यांनी जे लेखन केले तीच वाङ्मयक्षेत्रातील त्यांची महत्त्वपूर्ण कामगिरी. याशिवाय तात्यांनी 'विक्षिप्त', 'विदुषक' आदी विनोदी पत्रे काढली. **१९२८ :-** ललित लेखक आणि ज्योतिशास्त्राचे अभ्यासक पं. अरविंद गजेंद्रगडकर यांचा जन्म. संगीताचेही उाम जाण असणाऱ्या पं.गजेंद्रगडकरांनी 'स्वरांच्या वनात', 'स्वरसंगम', 'असे सूर-अशी माणसे' आदी १५ पुस्तके लिहिली. **१९२९ :-** संस्कृत वाङ्:मयाचे अनुवादक बळवंत रामचंद्र हिवरगावकर यांचे निधन. भासकवीच्या समग्र नाटकांची दोन खंडात त्यांनी भाषांतरे प्रसिध्द केले. तसेच कौटिल्य अर्थशास्त्राचेही दोन खंड त्यांनी प्रसिध्द केले. याशिवाय टागोरांच्या 'नॅशनलिझम' या ग्रंथावर आधारित 'राष्ट्रभावना' हा ग्रंथ प्रसिध्द. १९३६ : मराठी साहित्यात विविध विषयांवर विविधांगातले लेखन करणारे बालसाहित्यिक, कथाकादंबरीकार, पत्रकार, वक्ते, शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ.न.म. जोशी यांचा ११ जानेवारी १९३६ रोजी पुण्यात जन्म झाला. मुलांच्या मनात देशप्रेम रूजवण्यासाठी फत्तेवाडीचा झुंजार ही बालकादंबरी त्यांनी लिहिली. चरित्रवाङ्मयात श्री बसवेश्वर, लालबहाद्दूर शास्त्री, शामाप्रसाद मुखर्जी, रामशास्त्री प्रभुणे, प्रेषित, निःस्पृह या कादंबऱ्या, याशिवाय 'पत्रकारांचा शिक्षण विचार' हे वैचारिक वाङ्मय त्यांच्या नावावर आहे. त्यामध्ये २००३ सालच्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. **१९३६ :-** लेखक, वक्ते डॉ.अनंत देविदास अडावदकर यांचा जन्म. 'विनोबा भावे यांच्या वाङ्:मयाचा अभ्यास' या विषयावर प्रबंध प्राप्त करणाऱ्या अडावदकरांनी 'विनोबा-व्यक्ती आणि विचार, मुलांसाठी टागोरांच्या कथा तसेच 'जीवन विकास' मासिकातून लेखन. यांचे अनेक वैचारिक व अभ्यासपूर्ण लेख प्रकाशित. **१९३६ :-** लेखक पी. एच डी चे मार्गदर्शक प्रा डॉ विनायक विष्णू धावेकर यांचा जन्म. 'दूध सहकारी संस्था' आणि 'वनस्पती' हे ग्रंथ त्यांच्या लेखणीतून साकारले आाहेत. **१९३८ :-** योगशास्त्रविषयक ग्रंथकर्ते नानाभाई सदानंद रेळे यांचा जन्म. बालवयातच योगाभ्यास करणाऱ्या रेळयांनी संस्कृतमधील योगावरील ग्रंथ मराठीत आणले. त्यामध्ये 'पातंजलयोगशास्त्राचा अभिप्राय' या ग्रंथातून स्वरोदय, दृढयोग, लययोग, राजयोग आदी विषयांवर चर्चा केली. तर 'पातंजलयोगसुत्रार्थ' ह्या ग्रंथातून पातंजलयोगसूत्राचा अर्थ स्पष्ट केला. याशिवाय शंकराचार्यांच्या 'विवेकचुडामणि' चे भाषांतर आणि 'लक्ष्मीलहरी, श्रीसूक्त, पुरूषसुक्त' आदी पुस्तके मराठी भाषांतरासहित प्रसिध्द केली. **१९३८ :-** छायाचित्रण, प्रवास या विषयावर लेखन, संशोधन करणारे लेखक प्रकाश विष्णू गोळे यांचा जन्म. यांनी 'आनंदगान' हा निसर्गनिरीक्षणावर, 'एका तळ्यात होती, द्विजगणु अवघे वृक्षी' ही पक्षी निरीक्षणावरील पुस्तके, चक्रवाकेद्रेंशी' हे निसर्गाचे वैशिष्ट्य टिपणारे प्रवासवर्णनात्मक पुस्तक आणि 'प्रमत्त मानव ,'मानवतेची मंदिरे', 'विस्तारणारी क्षितिजे' ह्यातून मुलांसाठी जगाचा इतिहास लिहिला आहे. **१९४२ :-** कथा, ललित आदी स्वरुपाचे लेखन करणारे प्रा. यशवंत हणमंत देशपांडे यांचा जन्म. ८३,९९,९९९ ह्या नाटकासह 'उत्क्रांतीच्या शिडीवर' ह्या विज्ञान कथा आणि ङ्गगिनिपिगफ हे त्यांचे आणखी एक नाटक. **१९५० :-** कथालेखक अरूण गुलाबराव डावखरे यांचा जन्म. आतापर्यंत १५ पुस्तके प्रकाशित. त्यामध्ये 'एक वाडा उरलेला' हा कथासंग्रह, 'टेक इट लाईटली, हातचं सोडून' हे विनोदी कथासंग्रह. 'हंट द मॅन डाऊन', 'सो व्हॉट हॅपन टू मी?', 'रेज द टायटॅनिक', 'मास्टर ऑफ कूंग फू', 'आणि भूतकाळ जागा झाला' ह्या अनुवादीत कादंबऱ्या. 'प्रेमपत्रे तिची' ही कादंबरी, 'लंडन मिस्ट्री सिलेक्शन', 'ओ हेन्रील अमेरिकन सिन्स', 'अंडर वॉटर' इ. अनुवादीत कथासंग्रह, 'द ओमेन', 'इंडियाना जोन्स अँड टेम्पल ऑफ डूम', 'एअर पोर्ट ७७' ह्या अनुवादीत चित्रपट कथा. **१९६४ :-** ऐतिहासिक, पौरोणिक, सामाजिक अशी तीनही प्रकारची नाटके लिहिणारे नाटककार आणि नट शांताराम गोपाळ गुप्ते यांचे निधन. 'हिरा हरपला', 'रणरागिणी', 'पेशवाईनंतर', 'तंटया भिल्ल' ही ऐतिहासिक तर 'संगीत व

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

११ जानेवारी

१) श्रीम.संध्या चंद्रकांत आठवले, ब्राम्हणआळी, अलिबाग
११-१-१९५०

२) श्री.गुरूनाथ शंकर साखळकर मु.पो. मु.पो.सारळ, ता. अलिबाग
११-१-१९४०

श्री.शशिकांत नामदेव कोलते
वरसोली, अलिबाग
११-१-१९४४

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

बाजारपेठा फुलांनी गजबजल्या

फुल उत्पादकांवर लक्ष्मीची कृपा; दर वाढून देखील पूजेसाठी खरेदीचा कल

। पनवेल । वार्ताहर ।

आज मार्गशीर्ष महिन्याचा शेवटचा गुरुवार असल्यामुळे बाजार फुलांनी सजला आहे. फुलांना मोठी मागणी वाढली आहे. तसेच सध्या फुलांना बाजारात चांगला दर देखील मिळत आहे. त्यामुळं पनवेलमधील बाजारपेठेत फुलांना मोठ्या प्रमाणात मागणी आहे. मात्र, त्या तुलनेत पुरवठा होत नसल्याने बहुतांश सर्वच फुलांचे बाजारभाव कडाडले आहेत. पण मार्गशीर्षमधील लक्ष्मी पूजेनिमित्त फुलांना अधिक मागणी असल्याने फूल उत्पादकांवर लक्ष्मीची कृपा झाल्याचे दिसत आहे.

मार्गशीर्ष महिन्यात गुरुवारी गृहिणी घरोघरी लक्ष्मीची पूजा करतात. त्यानिमित्ताने करण्यात येत असलेल्या पूजेसाठी फुलांची मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. त्यातच सध्याच्या पाणी टंचाईच्या परिस्थितीमुळे फुलांच्या लागवडी अत्यंत कमी प्रमाणात आहेत. यामुळे मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्याने सध्या सर्वच फुलांचे बाजारभाव तेजीत आहेत.

गेल्या वर्षी मार्गशीर्ष महिन्यामध्ये शेवंतीचे बाजारभाव अत्यंत कमी होते.

यामुळे यंदा शेवंतीवर्गीय पौर्णिमा फुलांची लागवड अत्यंत कमी प्रमाणात असल्याने पनवेलमध्ये शेवंती १०० ते १२५ रुपये प्रतिकिलो बाजारभावाने विकली गेली. दरम्यान, पुढील कमीत कमी एक महिना बाजारभाव टिकून राहतील, अशी शक्यता वाटत आहे. यंदा शेवंती व झेंडूच्या फुलांचे भाव चांगलेच गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढले असले तरी त्याला मागणी मोठ्या प्रमाणात आहे.

फुलाचे प्रकार सध्याचे दर

बिजली	-	१०० ते १२५ रुपये
झेंडू	-	७० ते १०० रुपये
कापरी	-	८० ते ११० रुपये
गुलछडी	-	१२५ ते २०० रुपये
गुलाब	-	८० ते १२० रुपये (१० नग)

फूल कितीही महाग असले तरी त्याची खरेदी मात्र करीत असतात. गेल्या काही दिवसात फुलांचे मार्केट वाढले आहे. यात पांढरा गुलाब, टोरो, जरबेरा या फुलांचा समावेश आहे.

झेंडूची विक्री १०० ते १२० रुपये किलोप्रमाणे तर अष्टर, जरबेरा या फुलांची अनुक्रमे ८० ते ९० व १०० ते १२०रुपये किलोप्रमाणे विक्री सुरू आहे. टोरो गुलाबाची २५ फुले १५० रुपयांना विकली जात आहेत. फुलांचे भाव तिप्पट असले तरी काही नागरिक किमतीचा विचार न करता फुलांची खरेदी करताना दिसत आहेत.

'लाइटहाऊस' दीपस्तंभाप्रमाणे काम करेल : निधी चौधरी

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुलुंड (आय.टी.आय.) येथे सुरू झालेला लाइटहाऊस प्रकल्प दीपस्तंभाप्रमाणे काम करेल. कोणत्याही पदवीबरोबरच जागतिक बाजारपेठेत आवश्यक कौशल्य विकसित होणे अत्यंत गरजेचे आहे. हा फाऊंडेशन कोर्स आधुनिक काळातील कौशल्य विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल, असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या आयुक्त निधी चौधरी यांनी सांगितले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय आणि लाइटहाऊस कम्युनिटीज फाऊंडेशन यांच्यामार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड येथे मुंबईतील पहिल्या लाइटहाऊसचे उद्घाटन श्रीमती चौधरी यांच्या हस्ते झाले.

यावेळी व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक दिगांबर दळवी, महाराष्ट्र कौशल्य विकास मंडळाचे संचालक योगेश पाटील, लाइटहाऊस कम्युनिटीजचे चेअरमन डॉ. गणेश नटराजन, इक्लर्क्सला सर्व्हिसेस लिमिटेडचे सह-संस्थापक आणि कार्यकारी अधिकारी पी. डी. मुंद्रा, लाइटहाऊस कम्युनिटीजच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रुची माथूर उपस्थित होते.

चौधरी म्हणाल्या की, युवक आणि युवतीना स्पोकन इंग्लिश आणि डिजिटल साक्षरता अशा प्रकारचे प्रशिक्षण लाइटहाऊस प्रकल्पाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. ही २१ व्या शतकातील आवश्यक आणि गरजेची कौशल्ये आहेत. केवळ रोजगार देण्याऐवजी हा कार्यक्रम तरुणांना नोकरीत राहण्यास आणि करिअर घडविण्यास सक्षम करतो.

शेफाली शिरसेकर आणि वैभव कोल्हे यांनी प्रास्ताविक केले. लाइटहाऊस कम्युनिटीज फाऊंडेशनच्या मुख्य कार्यक्रम अधिकारी अमृता बहुलेकर यांनी आभार मानले.

'कुछ मिठा हो जाये'....बेस्ट बिफोरचा बोर्ड गायब

नवीन नियम धाब्यावर, ग्राहकराजा जागरुक नसल्याचा परिणाम

। रायगड । खास प्रतिनिधी ।

सध्या बाजारात मिळणारी मिठाई, ड्रायफ्रुट यांनाही एक्सपायरी डेट असते याची फारशी माहिती ग्राहकांना नसते अथवा त्याकडे कोणी लक्ष देत नाही. नियमानुसार प्रत्येक मिठाईच्या दुकानांमध्ये विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या मिठाईसमोर बेस्ट बिफोरचा बोर्ड लावणे बंधणकारक आहे. मात्र, जिल्ह्यातील बहुतांश मिठाई दुकानातून बेस्ट बिफोरचे बोर्ड गायब झाले आहेत. अन्न व औषध प्रशासन विभागाने अशा दुकानांवर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

ड्रायफ्रुट आणि मिठाई खाण्यासाठी एखादा सणच असायला पाहीजे, असा काही नियम नाही. त्यामुळे आजकाल मिठाई मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात येते. नफेखोरीसाठी भेसळयुक्त दूध, मावा यांची विक्री करण्यात येत असते. याच माव्यापासून विविध प्रकारची मिठाई तयार केली जाते. अन्न व औषध प्रशासनाच्यामार्फत त्यांच्यावर कारवाई करण्यात येते. परंतु त्यामध्ये सातत्य नसल्याने भेसळ करणाऱ्यांचे चांगलेच फावते.

मिठाईच्या दुकानांमध्ये मिठाई ठेवलेल्या ट्रेच्या समोर बेस्ट बिफोर म्हणजेच ती मिठाई किती दिवसात खावी असे लिहणे बंधणकारक केले आहे. नियम लागू होऊन दोन वर्षांहून अधिक कालावधी लोटला आहे. मात्र, काही मिठाई दुकानदार असे बोर्ड लावण्यास टाळाटाळ करतात आणि खराब झालेली मिठाईची विक्री करतात. मिठाई खराब निघाली, तर ग्राहक तातडीने संबंधित मिठाई दुकानदारांवर कारवाई करावी, अशी तक्रार करत नाही. छोट्या-छोट्या गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याची सवय ग्राहकांच्या अंगवळणी पडली आहे. मात्र, ते घातक ठरु शकते. खराब मिठाई खाल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे ग्राहकांनी मिठाई कधी तयार केली आहे आणि किती दिवसात ती संपवली पाहिजे, हे पाहणे गरजेचे आहे.

सूचनांचे पालन करा

मिठाई किती दिवसांपर्यंत खाण्यास योग्य आहे, हे सर्व मिठाई विक्रेत्यांनी जाहीर करणे गरजेचे आहे. मिठाई कधी तयार केली आहे, हे सुद्धा दुकानदाराने प्रदर्शित केले पाहिजे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व मिठाई विक्रेत्यांनी सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन सहायक आयुक्त अन्न व औषध प्रशासन विभागाने केले आहे.

बेसनापासून तयार मिठाई (१० ते १५ दिवस, बेसन लाडू, बुंदी लाडू म्हैसुरपाक आदी)
दुधापासून बनवलेले मिल्क केक, बर्फी, पेढे-एक दिवस
अधिक साखर टाकलेला पेढा १० दिवस
खव्यापासून बनवलेले पेढे ६ ते ७ दिवस
ड्रायफ्रुट मिठाई- ७ ते ८ दिवस
मोतीचुर लाडू- २ दिवस

कर्णबधिर मुलांनी लुटला सहलीचा आनंद

। पनवेल । वार्ताहर ।

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊन चॅरिटेबल ट्रस्ट संचालित कर्णबधिर मुलांच्या विशेष शाळेची सहल कर्नाळा येथील आदित्य फार्म हाऊस येथे काढण्यात आली होती. सहलीमध्ये रोटरी शाळेतील ४६ विद्यार्थ्यांनी व संजीवनी स्कूल रसायनी या शाळेतील ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या फार्म हाऊस मधील स्विमिंग पूल मध्ये विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद घेतला. या सोबतच विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सई पालवणकर व सेक्रेटरी डॉ. बागडे यांनी मुलांचे विविध गेम घेतले व इनरव्हिल क्लब तर्फे सर्व विद्यार्थ्यांना बक्षिसे व आईस्क्रीमचे वाटप केले. तसेच स्वप्निल मोरे यांनी विद्यार्थ्यांना झाडांची माहिती सांगितली.

सहलीच्या ठिकाणी संस्थेचे सचिव प्रमोद वालेकर, संस्था सदस्य चारुदत्त भगत यांनी सदिच्छा भेट दिली. शाळेच्या मुख्याध्यापिका शैला बंदसोडे यांनी संस्थेचे चेअरमन अरविंद सावळेकर क्लबच्या माजी अध्यक्षा वृषाली सावळेकर यांचे सहलीसाठी फार्म हाऊस आणि विद्यार्थी व कर्मचारी वर्गाच्या नाष्टा तसेच भोजनाची सोय उपलब्ध करून दिली त्याबद्दल आभार मानले. अशाप्रकारे मोठ्या उत्साहात रोटरी स्कूलमधील विशेष मुलांची सहल यशस्वीरित्या संपन्न झाली.

साईबाबांच्या पालखीचे भव्य स्वागत

। सोगांव । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील टाकादेवी येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तसेच मापगांव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सुनिल थळे यांनी श्री साईधाम पालखी पदयात्रा सेवा संस्थेची साईबाबांची पालखी रांजणपाडा ते शिर्डी पायी वारीचे रविवारी (दि.७) टाकादेवी येथील निवासस्थानी थळे कुटुंबियांच्या वतीने मोठ्या उत्साहात स्वागत करत दर्शन घेतले.

या पालखी सोहळ्यात पुरुष व महिला साईभक्त मोठ्या संख्येने व मोठ्या उत्साहाने पायीदिंडी यात्रेत सहभागी झाले होते.

यावेळी थळे यांच्या संपूर्ण कुटुंबातील सदस्यांनी साईभक्तांचे आपुलकीने स्वागत करत सर्व साईभक्तांना चहापाणी व अल्पोपहार देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

याकार्यक्रमास सरपंच उनिता थळे, अनिता शिंदे, विजय घरत, राजेंद्र घरत, हेमंत नेमन, अण्णा सातमकर, सूचित थळे, शलाका थळे, केशव चांदोरकर, प्रफुल्ल थळे, संदीप थळे तसेच इतर पुरुष व महिला कार्यकर्ते व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत साईबाबांच्या पालखीचे दर्शन घेतले. तसेच अतंर चालत जाऊन पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते.

एसटी महामंडळ राबविणार सुरक्षितता अभियान

। मुंबई । प्रतिनिधी ।

दरर्षीप्रमाणे वर्षाच्या सुरूवातीला एसटी महामंडळ सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीने एसटी कर्मचाऱ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने सुरक्षितता अभियान राबविते. यंदा हे अभियान एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयापासून सर्व आगार पातळीवर एकाच वेळी दि.११ ते २५ जानेवारी दरम्यान राबविण्यात येत आहे.

रस्ते वाहतूकीमध्ये सुरक्षित प्रवासाला अनन्य साधारण महत्व आहे. गेल्या ७५ वर्षात 'सुरक्षित प्रवास' हा एसटी महामंडळाचा मुख्य हेतू राहिलेला आहे. त्यामुळे एसटीने सर्वसामान्य प्रवाशांच्या म नामध्ये विश्वासार्हतेची व सुरक्षित प्रवास होणार ही भावना निर्माण केली आहे. वर्षभर अपघात टाळण्यासाठी प्रशिक्षण, प्रबोधन, विविध वैद्यकीय चाचण्या अशा विविध उपक्रमातून एसटीच्या चालकांना विनाअपघात बस चालविण्याचे प्रोत्साहन दिले जाते. या बरोबरच ०५ वर्ष, १० वर्ष, १५ वर्ष विनाअपघात एसटी बस चालविणाऱ्या चालकांचा यथोचित सत्कार केला जातो. तसेच, २५ वर्षापेक्षा जास्त विनाअपघात एसटी बस चालविणाऱ्या चालकांचा २५ हजाराचा धनादेश, प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह देऊन सपत्नीक सत्कार केला जातो.

अपघात टाळण्यामध्ये चालक हा महत्वाचा घटक असला तरी, प्रवासात त्याला सहकार्य करणारा वाहक व यांत्रीकदृष्टया सुस्थितीतील बस पुरविणारे यांत्रीक कर्मचारी हे घटक देखील तितकेच महत्वाचे असतात. हे लक्षात घेऊन एसटी महामंडळाचे यांत्रीक कर्मचारी व वाहक यांचे देखील चालकांप्रमाणे वेळोवेळी प्रशिक्षण व प्रबोधन केले जाते. म्हणून गेली कित्येक वर्ष रस्त्यावरील इतर खाजगी वाहनाच्या तुलनेत एसटीच्या अपघातांची संख्या अत्यंत कमी आहे.

या सुरक्षितता अभियानाच्या माध्यमातून यंदा देखील चालकांबरोबर यांत्रीक कर्मचारी व वाहक यांना देखील अपघात विरहित सेवेसाठी प्रोत्साहीत केले जाणार आहे. या बरोबरच पुर्ण वर्षभरात प्रवाशांना सुरक्षित प्रवास घडविण्याचे अभिवचन एसटी महामंडळ देत आहे. या अभियानाची सुरूवात दि.११ रोजी सकाळी ११:३० वाजता मुंबई सेंट्रल येथे एसटी महामंडळाचे नुतन उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र पोलीस महासंचालक कार्यालयाचेअरविंद साळवे, पोलीस अधिक्षक (वाहतूक) यांच्या हस्ते होणार आहे.

पद्माकर पाटील यांचे निधन

। सोगाव । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील मापगांव येथील ग्रुप ग्राम पंचायत मापगांवचे माजी सरपंच प्रभाकर दाजी पाटील यांचे धाकटे बंधू ज्येष्ठ समाजसेवक पद्माकर दाजी पाटील (८३) यांचे सोमवार (दि.१) हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी व अंत्यसंस्कारावेळी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील तसेच पंचक्रोशीतील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुले, एक विवाहित मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशपिंड कार्य बुधवार दि. १० रोजी तर उत्तरकार्य शुक्रवार दि.१२ रोजी मापगाव येथील राहत्या घरी होणार आहे.

रोहा प्रेस क्लबतर्फे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

। रोहा । प्रतिनिधी ।

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद मातृ संस्था असलेल्या रायगड जिल्हा प्रेस क्लब संलग्न रोहा प्रेस क्लबच्या वतीने रोह्याचे सुपुत्र स्व.डॉ. सी.डी. तथा चिंतामणराव देशमुख यांच्या जयंती सोहळ्याचे औचित्य साधत रविवार (दि.१४) सायंकाळी ५:३० वाजता श्रीराम मारूती चौक, रोहा येथे भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

सामाजिक बांधिलकी जपणारी तसेच शैक्षणिक कला-क्रीडा सांस्कृती वारसा जोपासणारी क्रियाशील पत्रकार संघटना असलेल्या रोहा प्रेस क्लबच्या माध्यमातून सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान, शिवचरण मित्र मंडळ, राजमुद्रा फाऊंडेशन, स्पंदन नाट्यसंस्था, मावळा प्रतिष्ठान, रोटरी क्लब ऑफ रोहा व श्रीकृपा फाऊंडेशन यांच्या वतीने भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेसाठी लहान गट (इ.८ वी ते १२ वी) विषयः- १)वनवा- दुर्लक्षित पण चिंताजनक विषयाची चिकित्सा, २)नैसर्गिक शेती- आजची गरज, ३)आजचा युवक क्रिकेट, कबड्डी, राजकारण की नोकरी प्राधान्य. ४) डॉ.सी.डी.देशमुख- राजकीय प्रवास व आजचे राजकारण, ५) नदी मरत नाही, मारली जात.

खुला गट (१२ वी पासून पुढे) विषयः- १)धाटाव एमआयडीसीला ठेकेदारी शाप की वरदान, २)राममंदिर- रामराज्य अजून कुठवर? ३) लग्न समारंभ- दारू, मटणावली प्रतिष्ठा योग्य की अयोग्य, ४)पत्रकारिता- समाजाची आजची अपेक्षा, ५)डिजिटल व्यवहाराने बदललेले आजचे अर्थकारण, ६)स्वातंत्र्योत्तर ७६ वर्षांनंतर आरक्षणाची आवश्यकता आहे का? स्पर्धेची नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी रोशन चाफेकर ८८८८०५६०९३, नंदकुमार मरवड ८३०८६८८२२९ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पनवेल तालुक्यात केंद्रीय योजनांवर भर

। पनवेल । वार्ताहर ।

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्यास अभियान यशस्वी करण्यासाठी पनवेल तहसीलकडून विविध शिबिरे घेण्यात येत आहेत. या योजनांमुळे पनवेल परिसरातील आदिवासी कल्याणकारी योजनांची यशस्वी अंमलबजावणी झाली असून तहसील विभागाकडून ही नवीन वर्षाची भेटच असल्याची भावना आदिवासींमध्ये आहे.

पनवेल तहसिल कार्यक्षेत्रात सध्या शिबिरांमधून आदिवासी बांधवांना आधारकार्ड काढणे, जन धन बँक खाते उघडून त्याला आधारकार्ड लिंक करणे, आयुष्यमान भारत कार्ड, किसान सन्मान निधी, जातीचे प्रमाणपत्र काढणे, घरकुल योजना, हर घर जल योजना तसेच वीज जोडणी इत्यादी सारख्या प्रमुख योजनांची सविस्तर माहिती तसेच लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. याच अनुषंगाने नुकतीच पनवेल तालुक्यात सुरू असलेल्या विविध शिबिरांचा आढावा घेण्यात आला. यावेळी आदिवासी प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, तहसीलदार विजय पाटील, गटविकास अधिकारी संजय भोये, महसुल नायब तहसीलदार राजश्री जोगी, निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार यांची उपस्थिती होती. यावेळी पनवेल तालुक्यातील लाभार्थ्यांना जास्तीत जास्त योजनांचा लाभ घेण्याबाबतचे आवाहन करण्यात आले.

> प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्यास अभियान यशस्वी करण्याकरिता पनवेल तहसीलच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर शिबिरे घेण्यात येत आहेत. या शिबिरांमधून शासनाच्या प्रमुख योजनांचा लाभ कसा घ्यावा, याबाबत मार्गदर्शन केले जात आहे.
> - विजय पाटील,
> तहसीलदार, पनवेल

आमचा कोळीवाडा नाटकाचे आयोजन

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण भेंडखळ येथील आई एकविरा सांस्कृतिक कला मंच प्रस्तुत आणि श्रीदत्त माऊली निर्मित आगरी कोळी भाषेतील धमाल नाटक आमचा कोळीवाडा शनिवार(दि.१३) पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सायंकाळी ४.३० वाजता नाट्य रसिकांच्या भेटीला येत आहे.

नाटकाचे दिग्दर्शन शैलेश शिंदे यांनी केले आहे. तर, संगीत आनंद कुबल यांचे लाभले आहे. नृत्यदिग्दर्शन राज आंगणे यांनी केले आहे. नाटकात शैलेश शिंदे, वासुदेव म्हात्रे, दीपक घाग, चेतन पाटील, प्रवीण भावल, आशिष गांवड, परीशा सरोदे, रुचिता म्हात्रे, मयुरी चव्हाण, निकिता पाटील व कौशिक म्हात्रे आदी रंगनायक अभिनय सादर करणार आहेत. अशी माहिती नाटकाचे लेखक व निर्माते कलासक्त कलायात्री दत्ता भोईर यांनी दिली.

कुंभारआळीतील विद्यार्थ्यांना इमारतीची प्रतीक्षा

■ इमारतीचे बांधकाम संथगतीने सुरु, काम वेगाने पूर्ण करण्याची मागणी

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ गावातील रायगड जिल्हा परिषदेची कुंभारआळी येथे शाळा आहे. त्या शाळेत आदिवासी भागातील विद्यार्थी शिक्षण घेण्यसाठी येत असतात. त्या शाळेची जुनी इमारत तोडून सहा वर्षे पूर्ण होत आली आहेत. तरी देखील नवीन इमारतीत विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी जाऊ शकले नाहीत. दरम्यान, नेरळ विकास प्राधिकरणाच्या निधीमधून शाळेची दुमजली इमारत बांधली जात असून शाळेच्या परिसराला बंदिस्त करण्यासाठी प्राधिकरणकडून दगडी कुंपण घालण्यात यावे अशी मागणी शाळा व्यवस्थापन समिती यांनी, केली आहे.

कुंभार आळी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची इमारत दुमजली बांधण्यासाठी पाडण्यात आली होती. २०१७ मध्ये तेथील कौलारू सहा वर्ग खोल्या असलेली इमारत पाडण्यात आली. त्यावेळी इमारत पाडल्यानंतर नवीन दुमजली इमारत बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन देखील करण्यात आले. मात्र २०२२ पर्यंत पाच वर्षात तेथे नवीन इमारत बांधण्याचे कोणतेही काम जिल्हा परिषदेच्या नेरळ विकास प्राधिकरणकडून झाले नव्हते. शाळेच्या आवारात केवळ दगड माती आणि विटांचे तुकडे तसेच नवीन इमारतीचे बांधकाम करण्यासाठी खोदलेले खड्डे अशी स्थिती होती. तर जुनी शाळेची इमारत तोडण्यात आल्यांनतर बाजूच्या वर्ग खोल्यांमध्ये शाळा हलविण्यात आली ती अजूनही तिथेच भरविली जात आहे. आजूबाजूला पडलेल्या बांधकाम साहित्यामुळे विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी देखील मैदान अपुरे पडत आहे. पण त्याकडे अनेक वर्षे दुर्लक्ष झाले होते, मात्र स्थानिक कार्यकर्त्यांनी नेरळ विकास प्राधिकरणाचे अधिकारी यांच्यासोबत सतत पाठपुरावा केल्याने २०२३ मध्ये नेरळ विकास प्राधिकरणाकडून कुंभार आळी येथील शाळेच्या इमारतीचे बांधकाम सुरु झाले.

> दुमजली शाळा रायगड जिल्हा परिषदेच्या दृष्टीने महत्वाची असल्याने ही शाळा रायगड जिल्ह्यातील सर्व सुविधा युक्त मॉडेल शाळा बनविण्यासाठी माझा प्रयत्न राहील.
> -संतोष दौंड
> गटशिक्षण अधिकारी
> कर्जत पंचायत समिती

> कुंभारआळी येथील शाळा नेरळ गावातील आणि आजूबाजूला असलेल्या आदिवासी भागातील पालकांची हक्काची शाळा आहे. शाळेत येणारी मुले लहान असल्याने नेरळ विकास प्राधिकरणाकडून दगडी कुंपणासाठी ग्रामपंचायतीकडून नेरळ विकास प्राधिकरणाकडे निधीची मागणी करीत आहोत.
> -गीतांजली देशमुख
> शाळा व्यवस्थापन समिती सदस्य

६० लक्ष रुपये खर्चून दुमजली इमारत बांधली जात असून या शाळेतील पहिली ते सातवी पर्यंतचे सर्व विद्यार्थी नवीन इमारतीत वेगवेगळ्या वर्गात बसून शिक्षण घेणार आहेत. त्याचवेळी त्या इमारतीत मुख्याध्यापक, शिक्षक कक्ष आणि स्वच्छता गृह देखील उभारण्यात येत आहेत. मात्र त्या दुमजली शाळेच्या इमारतीचे बांधकाम संथ गतीने सुरु असून २०२४मध्ये नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना नवीन इमारतीत वर्ग सुरु करू शकतात. मात्र शाळेची इमारत केवळ उभी राहिली असून आठ खोल्या एकत्र असलेली प्रशस्त इमारत उभी नेरळ गावाच्या वैभवात भर घालणार आहे. इमारतीचे बांधकाम वेगाने पूर्ण व्हावे अशी मागणी पालकांकडून कर्जत पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी संतोष दौंड यांच्याकडे केली आहे.

किल्ले पद्मदुर्गाची स्वच्छता

। मुरूड जंजिरा। वार्ताहर ।

मुरुड तालुक्यातील मजगावच्या श्री शिवभक्त मित्र मंडळातर्फे किल्ले पद्मदुर्ग स्वच्छता मोहीम रविवारी आयोजित करण्यात आली होती. श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यांची निर्मिती का व कशासाठी केली? पद्मदुर्ग का निर्माण केला? किल्ल्यावरील इमारती व त्यांचे विज्ञानाचे महत्त्व आदी संदर्भात माहिती स्वच्छतेसाठी आलेल्या शिवभक्तांना यावेळी देण्यात आली. पद्मदुर्गातील सर्व कचरा व प्लास्टिक या सर्वांनी गोळा केला. श्री शिवभक्त मित्र मंडळातील सर्व सदस्यांसह अन्य शिवभक्त यावेळीउपस्थित होते.यात शनिकेत भोईर, समीर माळी, आशिष बुल्ल, नितीन मानाजी, योगेश घरत, राज भोईर, शुभम भोईर, सुबोध पाटील, सार्थक शेडगे, अनंत निरकर व इतर सदस्य उपस्थित होते तसेच शिवकन्याही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

श्री शिवभक्त मित्र मंडळाचा स्तुत्य उपक्रम

संजय पवार यांना पुरस्कार

पनवेल : ऑल इंडिया सीफेरर्स युनियनचे अध्यक्ष, छत्रपती शिवाजी महाराज कामगार सेनेचे अध्यक्ष संजय वासुदेव पवार यांना राज्यस्तरीय शिवमावळे समाजरत्न पुरस्कार २०२४ ने सन्मानित करण्यात आले. यांनी महाराष्ट्रमध्ये आजवर केलेल्या कामगारांच्या साठी केलेल्या कार्याची पोच पावती, तसेच कामगारांसाठी आजवर केलेल्या कार्याची पोच पावती त्याचप्रमाणे समुद्र मधील खलश्यांचा साठी केलेले कार्ययाची दाखल घेऊन शिवमावळे सामाजिक सेवा संघाच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त दिनेश घोलप, पुरुषोत्तम घाग यांच्या नेतृत्वाखाली राज्यस्तरीय शिवमावळे समाजरत्न पुरस्काराने २०२४ ने सनमानीत करण्यात आले.

बोरीचामाळ घरफोडीतील चोरट्याला अटक

। तळा । वार्ताहर।

तळा तालुक्यातील बोरीचामाळ येथे झालेल्या घरफोडीचा अवघ्या २४ तासात छडा लावून तळा पोलिसांनी चोरट्याला अटक केली आहे. अंकित कृष्णा मिरगळ (२६, गोरेगाव पूर्व मुंबई) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून त्याच्याकडे रोख रक्कमेसह घरफोडीतील मुद्देमाल देखील सापडला आहे.बोरीचामाळ येथील सावित्री सुभाष मिरगळ आणि धोंडू तुकाराम लटके हे मुंबईमध्ये वास्तव्यास आहेत. त्यांचे गावी येणे-जाणे कमी असते घरी कुणीच नसल्याने पाळत ठेवून मंगळवारी सायंकाळी गावात आलेल्या अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाची कुलपे तोडून घरात प्रवेश केला व घरातील ऐवज चोरून नेला होता.

याबाबत सावित्री मिरगळ यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. फिर्याद दाखल होताच तळा सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला पोलिस हवालदार सुरेश पवार आणि संजय शिंदे यांनी घरफोडीचा कसून तपास करत असतानाच मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार आरोपी अंकित कृष्णा मिरगळ यांस गोरेगाव मुंबई येथून अटक करून आणले व त्याच्याकडील गुन्ह्यातील १०० टक्के माल हस्तगत करण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर घर बंद करून जाताना लोकांनी आपले दागिने, रोख रक्कम सोबत घेऊन जावे, असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी केले आहे.

नांदगाव विद्यालयात बँक व्यवहाराचे मार्गदर्शन

। पाली/गोमाशी। वार्ताहर ।

मुख्यमंत्री माझी शाळा सूंदर शाळा या उपक्रमाअंतर्गत नांदगाव विद्यालयात बँकेचे व्यवहार मार्गदर्शन तसेच शालेय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन आरडीसीसी बँक पाली शाखेचे व्यवस्थापक डी. के. देशमुख यांच्या हस्ते विज्ञान ज्योत पेटवून करण्यात आले.

शालेय विद्यार्थ्यांना आर्थिक व्यवहारा बद्दल माहिती असणे गरजेचे आहे.आजचे विद्यार्थी हेच उद्याचे भावी नागरिक असतात. विद्यार्थ्यांना बचत करण्याची सवय लागली पाहिजे.त्यामुळे त्यानी बचत केलेल्या पैशातून शैक्षणिक साहित्य, वैद्यकीय खर्च,आपल्या गरजा पूर्ण करता येऊ शकतात. विद्यार्थ्यांना बँकेच्या विविध खात्याच्या प्रकारांची तसेच विविध बँका विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज देतात या बाबत सखोल माहिती सांगितली .दैनंदिन जीवनात आपण आर्थिक देवाण घेवाण करण्यासाठी जिपे, उपीआय, भीम अँप,एटीएम, एनएफटी, आरटीजीसच्या माध्यमाचा वापर करतो.मात्र हे व्यवहार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पिन नंबर, ओटीपी नंबरचा काळजीपूर्वक वापर करणे आवश्यक आहे. नाहीतर तुमची मोठया प्रमाणावर आर्थिक फसवणूक होऊ शकते. तसेच विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सा, निरीक्षण क्षमता विकसित होऊन बाल वैज्ञानिक निर्माण होऊ शकतात असे बँक व्यवस्थापक देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. यावेळी बँक व्यवस्थापक डि.के देशमुख, प्राचार्य संभाजी ढोपे, प्रशांत जोशी,शिक्षक वृंद उपस्थित होते.

सुंदरराव मोरे महाविद्यालयाचा रौप्य महोत्सव

। पोलादपूर । वार्ताहर ।

शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित पोलादपूर येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ आणि वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन मान्यवरांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. १३) सकाळी ११ वाजता करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक रावेरकर यांनी दिली आहे.

रौप्य महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ आणि वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे उदघाटन विधानपरिषद सदस्य आ.प्रवीण दरेकर यांच्याहस्ते होणार असून खा. सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कार्यक्रम ाला महाड विधानसभा मतदार संघाचे आ. भरत गोगावले प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

रौप्य महोत्सवी वर्षातच महाविद्यालयाने प्रथमच ऑनलाइन आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करून विविध क्षेत्रातील गुणवत्तेच्या आधारावर मुंबई विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय हा पुरस्कार देखील प्राप्त केला आहे. नॅक संस्थेच्या तृतीय अधिस्वीकृतीसह आयएसओ मानांकन प्राप्त करणाऱ्या म हाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी सांगता समारंभा समवेत शैक्षणिक वर्षातील वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन देखील करण्यात आले आहे. शिवाई शिक्षण संस्थेचे विश्वस्त अमित मोरे यांच्या उपस्थितीत संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमासाठी परिसरातील पालक वर्ग आणि नागरिक बंधू-भगिनींनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. दीपक रावेरकर व उपप्राचार्य प्रा. सुनील बलखंडे यांनी केले आहे.

● मुरूड समुद्रकिनारी कोळी बांधव रात्रभर मासेमारी करून किनाऱ्यावर परतल्यावर ताज्या मासळीवर ताव मारण्यासाठी सीगल पक्षी व बगळे धाव घेतात. हवेत उडून उडून मासे टिपण्यासाठी कसरत करतानाचा क्षण टिपला आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

केवायसीच्या नावाने फसवणूक

पनवेल : ऍक्सिस बँकेतून बोलत असल्याचे सांगून तुमचे केवायसी केले नसल्यामुळे बँक खाते बंद होईल असे फिर्यादीस सांगून स्वतःच्या फायद्याकरिता सात लाख सात हजार २०० रुपये त्याच्या खात्यातून वळते करून सदर तक्रारदाराची फसवणूक केल्याबद्दलचा गुन्हा पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. उदय धाकड यांना एका अनोळखी मोबाईल क्रमांकावरून अनोळखी इसमाने बँकेतून बोलत असल्याचे सांगून तुमचे केवायसी नसल्यामुळे बँक खाते बंद होईल असे त्यांना सांगून त्यांचा विश्वास संपादन करून त्यांची फसवणूक केली.

औद्योगिक क्षेत्रात प्रतिबंधात्मक मनाई

। रायगड । खास प्रतिनिधी ।

खालापूर, खोपोली, रसायनी, रोहा, माणगाव, महाड, नागोठणे, अलिबाग या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर औद्योगिक कंपन्या आहेत. कामगार संघटनांकडून विविध मागण्यांसाठी अचानक संप व आंदोलन पुकारण्यात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन जातीय तणाव निर्माण होण्याच्या शक्यतेने औद्योगिक क्षेत्राकरिता प्रतिबंधात्मक मनाई आदेश जारी करण्यात आल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी दिली.

रायगड जिल्ह्यामध्ये बहुतांशी गावामध्ये हिंदू, मुस्लिम, बौद्ध तसेच इतर धर्मियांची मिश्रवस्ती आहे. अधून मधून वैयक्तिक कारणांमुळे पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये हिंदू, मुस्लिम व्यक्तींमध्ये दखलपात्र व अदखलपात्र गुन्हे घडत असतात. त्यामुळेदेखील हिंदू-मुस्लिम जातीय तणावाची परिस्थिती निर्माण होते. औद्योगिक क्षेत्रात शांतता प्रस्थापित राहावी, तसेच राजकीय परिस्थिती आंदोलन/ उपोषण व आत्मदहनाच्या वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी जिल्हा प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे. रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्राच्या हद्दीत २ ते १६ जानेवारी रोजी या कालावधीत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

ही अधिसूचना प्रेतयात्रेसाठी, अंत्यविधीच्या जमावास अगर शासकीय समारंभासाठी लागू नाही. तथापि, या कालावधीत होणारे उत्सव, सभा, मिरवणुका आदी कार्यक्रमास परवानगी देण्याचे अधिकार संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांना देण्यात येत आहेत. तहसीलदारांनी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन शांतता धोक्यात येणार नाही याची जबाबदारी आयोजकांवर राहील, या अटीवर परवानगी द्यावी, असे शिर्के यांनी म्हटले आहे.

'वैचारिक कवडसे' पुस्तकाचे प्रकाशन

। माणगाव । वार्ताहर ।

राज्यस्तरीय दुसरे फातिमाबी शेख मुस्लीम मराठीसाहित्य संमेलन सोलापूर येथे रविवारी (दि. ७) संपन्न झाले. या संमेलनात सायराबानू चौगुले यांनी लिहिलेले 'वैचारिक कवडसे' या पुस्तकाचे प्रकाशन अकोला येथील साहित्यिक तथा लेखिका प्रा. डॉ. अर्जिनबी युसूफ शेख हस्ते करण्यात आले. पुस्तक प्रकाशनास सुरय्या जहागीरदार, डॉ. अजीज नदाफ, प्रा. तांबोळी, प्रा. शकील शेख, अनिसा शेख, अय्युब नल्लामंदू, अँड. हाशम पटेल, खाजाभाई बागवान आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होते. कवयत्री चौगुले यांचे 'वैचारिक कवडसे' हे दुसरे पुस्तक देखील वाचनीय असून संमेलनाला उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● पिकअप आणि ४०७ टेम्पो चालवणारा अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. पगार १५०००/- ते १८,०००/- संपर्क : ८००७८९३२३२

● नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, नाश्ता बनवणारा कुक, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा (व्हॉटसॲप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५

● मौजे- चेंढरे, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, हॉटेल रविकिरण शेजारी, १४०० SQ.FT. गोडाऊन, भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१

● फ्लॅट भाड्याने मिळेल RCF कॉलनी जवळ ९४२३३७५१९८/ ८४११०१६४४४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

'युनायटेड वे' तर्फे शेतकऱ्यांना प्रशिक्षण

रोजगारनिर्मितीसाठी उपस्थितांना माहिती

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील शास्वत शेतीसाठी प्रयत्न करणारे युनायटेड वे स्वयंसेवी संस्थेकडून शास्वत शेतीसाठी मार्गदर्शन केले जाते. तालुक्यातील १७ गावांमध्ये समग्र ग्रामविकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. युनायटेड वे मुंबई संस्थेद्वारा जल संजीवनी प्रकल्प कर्जत तालुक्यातील आदिवासी बहूल भागातील खांडस, अंभेरपाडा, नांदगाव, कुरुंग ग्रामपंचायतीतील १७ गावात तसेच समग्र ग्रामविकास कार्यक्रम पाथरज आणि वारे ग्रामपंचायतीमधील एकूण ११ गावात युनायटेड वे मुंबई संस्था यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

सदर प्रकल्पांचा उद्देश गावांचा सर्वांगीण विकास करणे असून त्यात पिण्यासाठी पाणी उपलब्धता करून त्याचा इष्टतम वापर करणे (बंधारे, सूक्ष्म सिंचन वापर इ.), शाश्वत शेती अंतर्गत हवामान बदलामुळे शेतीवर होणाऱ्या दुष्परिणामांना कमी करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून राहणीमान उंचावणे, रोजगारनिर्मिती करणे, गुणवत्ता पूर्ण शिक्षण उपलब्ध करणे इ. आहे. कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांना मशरूम शेतीचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रगतीशील शेतकरी अनिल कदम यांनी विशेष नियोजन केले होते.

युनायटेड वे या संस्थेने 'मशरूम-उत्पादन, प्रक्रिया ते मार्केटिंग' ह्या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण खांडस ग्रामपंचायतीमधील पेटारवाडी येथे आले. सदर प्रशिक्षणासाठी जी. बी. एस. मशरूम आणि ॲग्रो बिजनेस प्रायवेट लिमिटेड, चंद्रपूर या कंपनीचे तज्ज्ञ प्रफुल्ल शेंडे यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. सदर प्रशिक्षणात एकूण ४२ जणांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला ज्यात २९ महिला व १३ पुरुष यांचा समावेश आहे.

तळा शाखेचा वर्धापनदिन

। तळा । वार्ताहर ।

भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा तळाचा २२ वा वर्धापनदिन बुधवार, (दि.१०) तळा येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी भीमराज जाधव होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते भगवान बुद्ध आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी उपस्थितांनी आपली मनोगते व्यक्त केली. या संस्थेच्या माध्यमातून धम्माचा प्रचार आणि प्रसार अधिक जोमाने करणे हे आपले सर्वांचे आद्यकर्तव्य आहे असे सांगण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश गायकवाड यांनी केले तर आभार नागराज पवार यांनी मानले. या कार्यक्रमास महिला व पुरुष पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

ग्रंथालयासाठी पुस्तके पाठवण्याचे आवाहन

। रसायनी । वार्ताहर।

अक्षर मानव ग्रंथालय विभागाकडून महाराष्ट्रभर वाचनालय सुरू होत असून सध्या सात्रळ (अहमदनगर), रसायनी (रायगड), राळेगणसिद्धी (अहमदनगर), बावी (अहमदनगर), दौंड, धायरी आणि रावणगाव (पुणे), औरंगाबाद, आंबेड बुद्रूक (संगमेश्वर, रत्नागिरी) या ठिकाणी ही वाचनालये सुरू आहेत. राज्यातील अन्य ठिकाणी ग्रंथालये सुरु करण्यासाठी संस्थेने पुढाकार घेतला आहे. कोणत्याही भाषेतील जुनी पुस्तके असल्यास ती अक्षर मानवला देणगी म्हणून देण्यात यावी, असे आवाहन रसायनीतील जेष्ठ साहित्यिक रोहिदास कवळे यांनी केले आहे.

वाचन संस्कृती रूजवण्याचा प्रयत्न अक्षर मानव संस्थेच्यावतीने सुरू आहे. सुमारे पाच-सहा लाखाची पुस्तके देणगी स्वरुपात प्राप्त झाली आहेत. आता काही ठिकाणी सुसज्ज संदर्भ ग्रंथालय सुरू करण्याचा मानस आहे. या संदर्भ ग्रंथालयामुळे मुलांना पदव्युत्तर शिक्षणासाठी उपयुक्त ठरणार असून त्यांना मुंबई, पुणे येथे जावे लागणार नाही. त्यांचा वेळ वाचण्यास मदत होणार आहे. अधिक माहितीसाठी ९३७००३५६७६ या क्रमांकावर संपर्क साधावा.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

दिनांक ११ जानेवारी, २०२४

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकतीपैकी ०-६१-७० हे.आर.पॉ. इतके क्षेत्र हे त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून श्री.मोहन तुलशीराम गायकर यांनी दिनांक २९/१२/२०२३ रोजी मा.दुय्यम निबंधक कर्जत -२ दस्त क्र.७१९३/२०२३ चे खरेदीखताचे दस्ताने विकत घेतलेले आहे. खालील परिशिष्टामधील श्री.मोहन तुलशीराम गायकर यांनी खरेदीचे दस्ताने खरेदी केलेल्या ०-६१-७० हे.आर.पॉ. क्षेत्राची मिळकत माझे अशिल सौ.ज्योत्स्ना फिलिप्स यांनी कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन - मौजे -नांदगाव, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रूपये	आकार पैसे
८८	१/ब / १	०-६१-७०	२	३०

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ताः मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर
ता.कर्जत जि.रायगड .४१०२०१

सही/-
ॲड.भुपेश तानाजी पेमारे
(ॲडव्होकेट)
दिनांकः११/०१/२०२४
मो नं. ९१५८२७७२८

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मिलींद वामराव चव्हाण, मु.पो. रानसई, ता. खालापूर, जि. रायगड, येथील रहिवासी असून धोंडीबा गणु पवार व इतर यांच्या मालकीची मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

गाव	मालक	सर्व्हे नं/ गट नं	हिस्सा नं.	एकूण क्षेत्र	आकार (रू.पै.)
मायनी/ तळदेव	धोंडीबा गणु पवार व इतर	३३	१४	०.१९.००	०.१२

वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वताः कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वतः जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेल व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि. ११/०१/२०२४

मिलींद वामराव चव्हाण,
मु.पो.रानसई, ता.खालापूर, जि.रायगड
मो. ९८२३३९७५३८

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणेः-

मौजे-नसरापुर, तालुका-कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
श्री.राजेंद्र रघुनाथ भागवत	६१	१/ड/४/ब	०.४०.००	०.४०

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तद्गंभुत हक्क हितसंबंध आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दिनांक : ११/०१/२०२४

खरेदीदारातर्फे वकील
ॲड.उत्कर्षा सुरेश सोनावळे
पत्ता.श्रीसाई सावली अपार्टमेंट, दुसरा मजला,
रूम नं.१३, दिवाणी न्यायालयासमोर,
कोतवालनगर, कर्जत, ता.कर्जत जि.रायगड,
मो.९०७५९९५९२८

ग्रुप ग्रामपंचायत शिध्रे

मु.पो.शिध्रे, ता.मुरूड-जंजिरा, जि.रायगड

जा.क्र. ४२ दिनांक ०९/०१/२०२४

साहित्य दरपत्रक मागणी निविदा

ग्रुप ग्रामपंचायत शिध्रे कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या साहित्य खरेदी बाबत महाराष्ट्र शासन निर्णय व रा.जि.प.यांजकडील नोंदणीकृत स्थानिक पुरवठादार/दुकानदारांकडून खालील कामांच्या मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	निधी स्तर	अंदा.दर
१	फवारणी (सन २०२०/२०२१)	१५ वा वित्त आयोग	१५०००/-
२	हाथपंप खरेदी करणे. (सन २०२०/२०२१)	१५ वा वित्त आयोग	२३०००/-
३	ग्रा.पं.हद्दीतील पाणी पुरवठा योजनावर जलशुध्दीकरण व यंत्रणा बसविणे.(सन २०२३/२०२४)	१५ वा वित्त आयोग	३३४८०४/-
४.	औषध व साहित्या खरेदी करणे (सन २०२३/२०२४)	१५ वा वित्त आयोग	४००००/-
५.	मराठी शाळा शिध्रे प्रोजक्टर फिटींग करणे.(सन २०२३/२०२४)	१५ वा वित्त आयोग	५००००/-
६	महिलांकरीता व्यवसायक प्रशिक्षण शिबीर राबविणे.(सन२०२३/२०२४)	१५ वा वित्त आयोग	४०३५६/-
७	आदिवासी शिध्रे स्माशानभूमी येथे सोलर लँम्प बसविणे. (सन२०२३/२०२४)	१५ वा वित्त आयोग	२८९८७/-

टिप-

१) दिनांक-१६/०१/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत दरपत्रक सादर कराव्या. उशिरा आलेल्या दरपत्रक/अर्ज स्विकारल्या जाणार नाही. सदर दरपत्रकबाबत मंजुरीनुसार परस्पर बोर्डावर प्रसिद्धी करण्यात येईल.
२) पुरवठादार/दुकानदार जी.एस.टी.धारक नोंदणीकृत असावेत.
३) ग्रामपंचायत शिध्रे कडे उपलब्ध निधी नुसारच बिल देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
४) १ किंवा सर्व दरपत्रक अर्ज फेटाळण्याचे सर्व अधिकार तसेच दरपत्रमंजुरीचा सर्व अधिकार सरपंच ग्रामपंचायत शिध्रे यांसकडे ठेवण्यात येत आहे.

सही/-
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत शिध्रे
ता.मुरूड, जि.रायगड

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत शिध्रे
ता.मुरूड,जि.रायगड

दिनांक ११ जानेवारी, २०२४

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे -पिंपळपाडा, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.-आर.-पॉ.	आकार रूपये	आकार पैसे
पार्कऑन्स प्रॉपर्टीचे भागीदार सचिन राधाकृष्ण जाधव आनंदराम दगडुराम मुथा	४७	४	०१-०६-००	००	९५

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ताः २०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक, (अंबिका नाका), पो.नेरळ, ता.कर्जत जि.रायगड

सही/-
अल्पेश अनंत कराळे
(ॲडव्होकेट)
दिनांक : ११/०१/२०२४
मो नं. ९९२२३६८१२१

दिनांक ११ जानेवारी, २०२४

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे -बांगरवाडी, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.-आर.-पॉ.	आकार रू.पै.
अजय मधुकर ठाणेकर	७९	६	२-१५-५०	५-५७

यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र १-७८-०

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ताः मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर
ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१

सही/-
ॲड.भुपेश तानाजी पेमारे
(ॲडव्होकेट)
दिनांक : ११/०१/२०२४
मो नं. ९१५८२७७२८

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. पार्थ सारथी सरकार यांच्याकडून कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे वावे, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत

वरील जमिन मिळकत सर्व्हे नं.२४/४ एकूण १५.४० गुंठे, जागा विकत घेणार आहेत. तरी जमिन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनांक : ११/०१/२०२४

ॲड देविदास यशवंत देवघरे
पत्ता.मु.पो.कडाव, ता.कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत जमिनीचे विद्यमान मालक यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे माझे अशिलांचे सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांचे बरोबर बोलणी झालेली आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे शहाबाज, ता.अलिबाग, जि.रायगड येथील शेत जमिन मिळकत.

मालकाचे नांव	सर्व्हे नं./ गट नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ. हे.आर	आकार रु.पै.
श्री. महेंद्र दामोदर म्हात्रे, वगैरे ६	६५७	-	०.२९.००	३.४९
		पो.ख.	०.०३.५०	
		एकूण	०.३२.५०	

ही जमिन मिळकत या नोटीसचा विषय आहे.

तरी सदर जमिन मिळकती बाबत कोणाचाही विक्री, साठेकरार, गहाण, दान, बक्षीस, वारसा हक्क, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, लिज, लिन जमिनकी, कुळहक्क, भाडेपट्टा, कुळमुखत्यारपत्र, कोर्ट मॅटर, मृत्युपत्र अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांत खाली सही करणार यांचे पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात हरकत घ्यावी. सदर मुदतीत कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास मिळकतीत कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे तसे गृहीत धरून व मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून मिळकतीचा नोंदणीकृत साठेकराराचा/खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदती नंतर येणाऱ्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळविले.

पेण.
दि. ११/०१/२०२४

ॲड.आर.आर.म्हात्रे
परमार प्लाझा, गाळा नं. ९
पेण पोलीस स्टेशन जवळ,
ता.पेण, जि.रायगड
मो.नं. ९४२२६८९५९८/७३५०८११०५५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन :

१) मौजे-मेचकरवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील शेतजमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे-आर-पॉ.	आकार रूपये	आकार पैसे
१)रामदास किसन महारनवर २)शैलेंद्र मोहन पाटील ३)अनिल रामराव गोगावले	५८ (जुनी धामणी १५८)	४	०-२८-००	०	२०

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता - फ्लॅट नं.४, ए-विंग,
पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत
नगरपालिका शेजारी, ता.कर्जत जि.रायगड
४१०२०१

सही/-
ॲड.जयेश संभाजी म्हसे
दिनांक : १/०१/२०२४
मो.नं.९०२८९८२२७७
ई मेल : adv.jayeshmhase@gmail.com

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती मिळकतींचे विद्यमान मालक श्री.जयेंद्र नागू म्हात्रे, सौ.मोनाली मोहन घरत, सौ.कविता गणेश ठाकूर, श्रीमती संगीता नागू म्हात्रे, श्रीमती सुनंदा चंद्रकांत म्हात्रे, श्री.रमेश चंद्रकांत म्हात्रे, श्री.सुरेश चंद्रकांत म्हात्रे, सौ.सुशिला महेश म्हात्रे, श्रीमती जयश्री चंद्रकांत म्हात्रे, श्रीमती राजश्री चंद्रकांत म्हात्रे यांचेकडून खरेदी घेणेचा करार केला आहे. सदर मिळकतीमधील हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे- कोळगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील

भूमापन क्रमांक	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू.पै.
१२२	०-३४-२०	२.७५

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक : १०/०१/२०२४

ॲड.रविंद्र वि.ओक
'गुरूकृपा' अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड, मु.पो.ता.अलिबाग जि.रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चेंढरे, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या निवासी सदनिकेचे विद्यमान मालक सौ.आशा अशोक कणेकर रा.स्वतंत्र अपार्टमेंट, बिल्डींग नं.१४, संत तुकाराम रोड, मुलुंड-पूर्व मुंबई-४०० ०८१ यांच्या मालकीहक्काचा व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली निवासी सदनिका माझे स्नेही श्री.संतोष सुधाकर थळकर, रा.रूम.नं.७, यशमंगल, चेंढरे, शिवाजी नगर, चेंढरे ता.अलिबाग जि.रायगड यांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे स्नेही यांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या स्नेहींना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे चेंढरे, ता.अलिबाग येथील स.नं.८२/ब१, हि.नं.४व स.नं.८३/५ या मिळकतीमध्ये उभी असलेली विष्णू-लक्ष्मी विहार को.ऑप.सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., चेंढरे या इमारतीतील अे-विंगमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र.१५, (ग्रामपंचायत चेंढरे घर क्र.७०६/१५) क्षेत्र ७३५ चौ.फूट बिल्टअप

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा, कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा, व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या स्नेहींवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १०/०१/२०२४

सही/-
श्री.जयवंत दत्तात्रेय म्हात्रे
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड,

ग्रुप ग्रामपंचायत शिध्रे

मु.पो.शिध्रे, ता.मुरूड-जंजिरा, जि.रायगड

जा.क्र. ४२ दिनांक ०९/०१/२०२४

अल्प मुदतीची निविदा सुचना

ग्रुप ग्रामपंचायत शिध्रे ने १५ वा वित्त आयोग सन २०२०/२०२१, २०२१/२०२२ २०२२/२०२३ व २०२३/२०२४ योजनेअंतर्गत खालील प्रमाणे कामांसाठी सिलबंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे. तरी अधिकृत ठेकेदारांनी दि.१६/०१/२०२४ रोजी संध्या ठीक ५:०० वाजेपर्यंत निविदा पाठवाव्यात, आलेल्या निविदा दि.१७/०१/२०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता उघडण्यात येतील, त्यावेळी उपस्थित रहावे. निविदा फॉर्म दि.१६/०१/२०२४ रोजी संध्या ठीक ०५:०० वाजेपर्यंत दिले जातील, त्यानंतर उशीरा आलेल्यांना दिले जाणार नाही.

अ. क्र.	कामाचे नाव	योजनेचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	इसारा रक्कम	सुरक्षा अनामत	निविदा किंमत	निविदा पाठविण्याची अंतिम तारीख	कामाची मुदत
१	शिध्रे मोहल्ला अंतर्गत नळ पाईपलाईन टाकणे (सन २०२०/२१)	१५ वा वित्त आयोग	५३०००/-	५३०/-	२६५०/-	१००/-	१६/०१/२०२४ संध्या ५ वाजेपर्यंत	३ महिने
२	नवेवाडी अंतर्गत पाईप लाईन टाकणे (सन २०२१/२२)	१५ वा वित्त आयोग	१४३२८१/-	१४३३/-	७१६५/-	१००/-	१६/०१/२०२४ संध्या ५ वाजेपर्यंत	३ महिने
३	वाणदे अंतर्गत पाईप लाईन दुरूस्ती करणे. (सन २०२१/२२)	१५ वा वित्त आयोग	१२४१८५/-	१२४२/-	६२१०/-	१००/-	१६/०१/२०२४ संध्या ५ वाजेपर्यंत	३ महिने
४	शिध्रे शाळा कंपाऊंड वॉल दुरूस्ती व रंगरंगोटी करणे. (सन २०२१/२२)	१५ वा वित्त आयोग	७६२७५/-	७६३/-	३८१४/-	१००/-	१६/०१/२०२४ संध्या ५ वाजेपर्यंत	३ महिने

अटी व शर्ती

१) १ टक्के इसारा रक्कम अंदाजपकीय रक्कमेच्या कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी भरावी लागेल व उर्वरीत रक्कम देयकातून कपात केली जाईल.
२) कोरे निविदा फॉर्म फी रू.१००/- इतकी राहिल.
३) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आवश्यक असल्यास फी भरून त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
४) प्राप्त निविदा दि.१७/०१/२०२४ रोजी सकाळी ठिक ११:३० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात शिध्रे येथे उपस्थितांचे समक्ष मा.सरपंच यांचे हस्ते उघडणेंत येईल.
५) निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपले रजिस्टेशनचे दाखले हे सत्यप्रत केलेले असावेत व सोबत चालू आर्थिक वर्षात केलेले कामाचा समक्ष प्राधिकाऱ्यांचा दाखला असावा. प्रथम प्राधान्य नोंदणीकृत ठेकेदारांस दिला जाईल.
६) कोणतीही १ अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच शिध्रे यांनी राखून ठेवला आहे.
७) प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे रक्कम कपात केल्या जातील. मा.शाखा अभियंता साहेब बांधकाम पं.स.मुरूड यांचेकडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी/सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
८) काम अंतिमरित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
९) जी.एस.टी.नंबर आवश्यक आहे.
१०) पॅन कार्ड नंबर आवश्यक आहे.

सही/-
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत शिध्रे
ता.मुरूड, जि.रायगड

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत शिध्रे
ता.मुरूड, जि.रायगड

बंगाल वॉरियर्सचा दमदार विजय

तेलुगू टायटन्सचा दहावा पराभव

टॉप परफॉर्मर्स

तेलुगु टायटन्स
सर्वोत्कृष्ट रेडर – पवन सेहरावत (११ रेड पॉइंट)
सर्वोत्कृष्ट बचावपटू – संदीप धुल (४ टॅकल पॉइंट)

बंगाल वॉरियर्स
सर्वोत्कृष्ट रेडर – नितीन कुमार (९ रेड पॉइंट)
सर्वोत्कृष्ट बचावपटू – वैभव गर्जे (९ टॅकल पॉइंट)

। मुंबई । वृत्तसंस्था ।

बंगाल वॉरियर्सने मंगळवारी मुंबईतील प्रो-कबड्डी लीग सीझन १० च्या सामन्यात तेलुगू टायटन्सचा ४६-२६ असा पराभव केला. बचावात्मक कामगिरी केल्याने त्यांची विजयी मालिका खंडित झाली. वॉरियर्सचा बचावपटू वैभव गर्जे हा स्टार खेळाडू होता. त्याने जबरदस्त ९ टॅकल पॉइंट मिळवले, तर टायटन्सचा कर्णधार पवन सेहरावतने आणखी एक सुपर १० मिळवला.

बंगाल वॉरियर्स त्यांच्या कर्णधार आणि उत्कृष्ट रेडर मनिंदर सिंगशिवाय खेळत होते, परंतु त्यामुळे नितीन कुमारला स्पॉटलाइट मिळवण्याची संधी मिळाली. त्याने तेलुगू टायटन्सचा बचाव त्याच्या चढाईने अडचणीत आणला, तर वॉरियर्सचा कर्णधार शुभम शिंदे आणि वैभव या बचावात्मक जोडीने चमकदार कामगिरी केली. वॉरियर्सला पहिला ऑलआऊट मिळवण्यासाठी आणि १०-४ अशी आघाडी घेण्यासाठी ७ मिनिटे लागली.

वैभवने पवनला अचूक टॅकलमध्ये पायचीत करून सुरुवातीच्या हाफमध्येच सहावा टॅकल पॉइंट मिळवला आणि वॉरियर्सने हाफ टाईम संपल्यावर दुसरा ऑलआऊट गुंडाळला. वॉरियर्सने १७ गुणांची आघाडी घेतली.

उत्तरार्धात टायटन्सने आपले सर्वोत्तम पाऊल पुढे ठेवले आणि पुनरागमनाच्या दिशेने झुंज दिली. त्यांनी झटपट गुणांचा मारा केला आणि ३३ व्या मिनिटाला पवनने शुभम आणि आदित्य एसला मागे टाकून ऑलआऊट केले. तेव्हा त्यांच्या अथक प्रयत्नांना यश आले. याच चालीमुळे वॉरियर्सची आघाडी ३३-२४ अशी ९ गुणांवर कमी झाली.

नितीनने मात्र टायटन्सला पुनरागमनाची कोणतीही संधी दिली नाही. त्याने क्लीन-अप करत संदीप धुल आणि मोहीत यांच्या तावडीतून सुटका केली आणि टायटन्सवर तिसरा ऑलआऊट केला. दोन मिनिटांपेक्षा कमी वेळात, स्कोअरलाइन वॉरियर्सच्या बाजूने ४२-२४ अशी झाली. शुभमने पवन आणि रॉबिन चौधरी यांच्यावर टॅकल मारून खेळाचा शेवट केला आणि हंगामातील चौथा विजय मिळवला.

कराटे चॅम्पियन स्पर्धेत भक्ती भोईरने पटकाविले सुवर्ण पदक

दीपक घरत, प्रगती घरत, मिलन जाधव, अजय तांडेल, सोनल तांडेल यांचे मोलाचे मार्गदर्शन

। उरण । वार्ताहर ।

शौर्य मार्शल आर्ट्स अँड स्पोर्ट्स अकॅडमी रायगड यांच्यावतीने दुसरी रायगड जिल्हा स्तरीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा जय किसान विदयामंदिर पटांगण वडखळ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेत भक्ति विजय भोईर हिने काता आणि कुमिते प्रकारात सुवर्ण पदक पटकाविले आहे. तसेच तनिष्का नितीन ठाकूर काता प्रकारात सुवर्ण पदक कुमीते प्रकारात रौप्य पदक, स्वरा सुनिल पेढवी हिने काता प्रकारात रौप्य पदक कुमिते प्रकारात सुवर्ण पदक, ओम योगेश पाटील याने काता प्रकारात रौप्य पदक, कुमिते प्रकारात सुवर्ण पदक पटकाविले. रीयांशी राजेश कालेल काता प्रकारात सुवर्ण पदक, तनिष वैभव मढवी काता प्रकारात रौप्य पदक कुमिते प्रकारात कांस्य पदक, आशा शरद सोनावणे कुमिते प्रकारात कांस्य पदक, काता प्रकारात सुवर्ण पदक, भूमी प्रकाश पाटील कांस्य पदक, जतीन रामचंद्र म्हात्रे कांस्य पदक, दिक्षा अर्जुन वग्रे कांस्य पदक, नैतिक संजय घरत कांस्य पदक, अशा विविध स्पर्धकांनी सुवर्ण पदक, रौप्य, कांस्य पदक पटकाविले आहेत. या विजयी स्पर्धकांना कोच दिपक घरत (थर्ड डिग्री ब्लॅकबेल्ट), प्रगती घरत (सेकंड डिग्री ब्लॅक बेल्ट), मिलन जाधव (सेकंड डिग्री ब्लॅक बेल्ट), अजय तांडेल (ब्लॅक बेल्ट), सोनल तांडेल (ब्लॅक बेल्ट) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या सर्वच विजयी स्पर्धकांवर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विजय विकास सामाजिक संस्थेचे विजय भोईर, विकास भोईर यांनीही सर्व विजयी स्पर्धेकांचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

बीसीसीआयशी खोटे बोलून दुबईत पार्टी करणं भोवलं?

इशान किशनला संघात स्थान नाही

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेला गुरुवारपासून (११ जानेवारी) सुरुवात होणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. नियमित कर्णधार रोहित शर्मा आणि अनुभवी फलंदाज विराट कोहली परतले आहेत. दोघेही नोव्हेंबर २०२२ नंतर प्रथमच टी-२० संघात परतले आहेत. दोन अनुभवी खेळाडू परतले, पण टीम इंडियाचा यष्टीरक्षक फलंदाज इशान किशनला संघात स्थान मिळवता आले नाही. मागील मोसमात त्यांनी मानसिक थकव्याचे कारण देत खेळण्यास नकार दिला होता, मात्रा याच कालावधीत तो दुबईमध्ये पार्टी करत असल्याचे समोर आले.

इशान किशनने आतापर्यंत भारतासाठी दोन कसोटी २७ एकदिवसीय आणि ३२ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. वर्ल्ड कप २०२३ नंतर भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी इशान किशन हा भारतीय संघाचा भाग होता. त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये खेळण्याची संधी देखील मिळाली.

यानंतर तो दक्षिण आफ्रिका टी-२० दौऱ्यावर भारतीय संघाचा भाग होता, परंतु त्याला खेळण्याची संधी मिळाली नाही. इशान किशन मानसिक थकव्याचे कारण देत दक्षिण आफ्रिका दौऱ्यावरून परतला होता. इशान किशनला संघात ठेवल्यानंतरही त्याला खेळण्याची संधी मिळत नसल्याचे बोलले जाते. त्यामुळे तो कदाचित नाराज आहे. यादरम्यान इशान किशनच्या दुबईमध्ये पार्टी केल्याची बातमी समोर आल्याने त्याचे टेन्शन आणखी वाढले आहे.

खरंतर, इंडियन एक्स्प्रेसच्या रिपोर्टमध्ये असे म्हटले होते की, मानसिक थकवा आणि सतत प्रवास केल्यामुळे ईशान किशनला ब्रेक घ्यायचा होता. सूत्राने सांगितले की, ईशानने निवडकर्त्यांना विनंती केली होती की तो मानसिकदृष्ट्या थकलेला आहे आणि त्याला काही काळ क्रिकेटमधून ब्रेक घ्यायचा आहे. आणि कुटुंबासोबत वेळ घालवायचा आहे.

न्यूलँड्सच्या खेळपट्टीवर पाच दिवसांनी कारवाई

खेळपट्टी असमाधानकारक

काय म्हणाला होता रोहित शर्मा

न्यूलँडस्ची खेळपट्टी फलंदाजीस धोकादायक होती, तरी भारतीय कर्णधार रोहित शर्माने त्याचा बाऊ केला नाही. उलटपक्षी त्याने आयसीसीसह सर्वांना सुनावले होते. जोपर्यंत भारतीय खेळपट्ट्यांबाबत आपली तोंडे बंद ठेवत नाही, तोपर्यंत अशा खेळपट्ट्यांवर खेळायला आम्हाला हरकत नाही. आम्ही येथे क्रिकेट खेळायला येतो. आव्हाने किती असली तरी ती स्वीकारतो. कारणे देत नाही. भारतातील खेळपट्ट्यांवर पहिल्या दिवसापासून चेंडू फिरकी घेऊ लागला की ओरड केली जाते.

। दुबई । वृत्तसंस्था।

सर्वांत कमी वेळेत खेळ संपल्यामुळे चर्चेत आलेल्या केपटाऊनमधील न्यूलँड्स येथील भारत-दक्षिण आफ्रिका कसोटी सामन्यातील खेळपट्टीबाबत आयसीसीला शेरा मारण्यासाठी पाच दिवस लागले. ही खेळपट्टी असमाधानकारक होती असे आयसीसीने मंगळवारी जाहीर केले.

जेमतेम दीड दिवस चाललेली ही कसोटी कमीत कमी षटकांची (६४२ चेंडू) ठरली होती. या दीड दिवसात दोन्ही संघांचे मिळून ३४ फलंदाज बाद झाले. तरीही भारताने शानदार विजय मिळवत मालिकेत बरोबरी साधली होती.

सामनाधिकारी ख्रिस ब्रॉड यांनी मैदानावरील पंचांनी व्यक्त केलेली चिंता त्यानंतर रोहित शर्मा आणि डीन एल्गर या दोन्ही संघांच्या कर्णधारांशी चर्चा केल्यानंतर आपला अहवाल तयार केला आणि तो आयसीसीला सादर केला. ही खेळपट्टी दर्जाहीन होती, असे दोन्ही कर्णधारांनी म्हटले होते. खेळपट्टीसाठी असलेल्या गुणांकनातील एक गुण कमी करण्याची कारवाई आयसीसीने केली.

न्यूलँडस्ची ही खेळपट्टी फलंदाजीस फारच आव्हानात्मक होती. चेंडू अचानक उसळत होते. पूर्ण सामनाभर धोक्याची घंटा वाजत होती. परिणामी फटके मारणेही कठीण जात होते. काही फलंदाजांच्या ग्लोव्हजला चेंडू लागले. चेंडूच्या अनपेक्षित उसळीमुळे अनेक फलंदाज बाद झाले, असे सामनाधिकारी ब्रॉड यांनी आपल्या अहवालात म्हटले आहे. आयसीसीकडून कारवाईत मिळालेला एक वजा गुण पुढे जाऊन त्या मैदानासाठी घातक ठरू शकतो.

क्षेत्ररक्षण करताना मुंबईत क्रिकेटपटूचा मृत्यू

- **क्रीडा विश्व हादरलं!**
- **एकाच वेळी सुरू होते दोन सामने**

। मुंबई । वृत्तसंस्था ।

क्रिकेट मैदानावर एक मोठी दुर्घटना घडली आहे. क्रिकेट सामना खेळत असताना एका ५२ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. मैदानावर दोन सामने सुरू असल्याने हा अपघात झाला. दुसऱ्या सामन्यातील चेंडू जयेश सावला नावाच्या व्यक्तीच्या डोक्याला लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

सोमवारी दुपारी माटुंगा येथील दादरकर मैदानावर एकाच वेळी दोन सामने सुरू होते. दोन्ही सामने एकाच टी-२० स्पर्धेतील होते. ५० वर्षांवरील लोकांसाठी ही स्पर्धा होती. कुटची विसा ओखल विकास लिजंड कप असे या स्पर्धेचे नाव आहे.

या मैदानावर नेहमीच अनेक सामने एकाच वेळी खेळले जातात. त्यामुळे अनेक खेळाडू जखमी होत असल्याचे वेळोवेळी समोर आले आहे. अशा अपघातात एखाद्याचा मृत्यू होण्याची ही पहिलीच वेळ आहे. जयेश सावलाला मागून चेंडू लागला आणि तो तिथेच पडला, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. त्याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. लायन ताराचंद रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, सावला यांना सायंकाळी पाचच्या सुमारास मृत अवस्थेत रुग्णालयात आणण्यात आले. त्यानंतर शवविच्छेदन करून मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला आहे. या अपघातात कोणत्याही प्रकारचा कट किंवा घातपात असण्याची शक्यता नसल्याचेही पोलिसांनी सांगितले.

पहिली राष्ट्रीय सागरी खेळ स्पर्धा

महाराष्ट्राच्या खेळाडूंची दमदार कामगिरी

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

४ ते ११ जानेवारी दरम्यान दिव येथे पार पडत असलेल्या बीच गेम्स क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सर्वोत्तम कामगिरी करताना एकूण ३ सुवर्ण २ रजत ४ कांस्य अशी ९ पदके जिंकून पिंच्याक सिलॅट खेळात महाराष्ट्राचे टॉप श्रीमधील अव्वल स्थान अबाधित ठेवले. दिव बिच गेम्स २०२४ मध्ये मल्लखांब, टग ऑफ वॉर, बीच बॉक्सिंग, बीच व्हॉलीबॉल, बीच सॉकर, सी स्विमिंग, बीच कबड्डी आणि पिंच्याक सिलॅट असे एकूण ८ खेळ समाविष्ट करण्यात आले असून त्यात एकूण १२०० खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. त्यातील पिंच्याक सिलॅट खेळामध्ये भारतातील विविध राज्यातून निवडण्यात आलेल्या २२० खेळाडूंमध्ये महाराष्ट्र संघात १७ खेळाडू होते.

फाईट इव्हेंट सुवर्णपदक ओमकार नवनाथ सानप (६०-६५) किलो , पियुष अभय शुक्ला (८५-१००) किलो, भक्ती शिवाजी किल्लेदार (७५-९५) किलो वजनी गटातील फाईट इव्हेंटमध्ये सुवर्ण पदक , टँडींग फाईट इव्हेंट व सोलो क्रिएटीव्हीटीमध्ये किर्णाक्षी किशोर येवले हिने (६०-६५) किलो वजनी गटात दोन रौप्य पदके पटकावले. शुभम गणेश किंगरे (४५), समीक्षा सतीश सावंत (४५-५०), दिक्षा शंकर शिंदे (७०-७५) किलो, स्नेहल सचिन डांगे (६५-७०) यांनी फाईट इव्हेंटमध्ये कांस्य पदके पटकावली.

या स्पर्धेचा उदघाटून समारंभ ४ जानेवारी रोजी केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर, दिल्ली लेपटनंट गव्हर्नर विनय कुमार सक्सेना, लडाखचे लेपटनंट गव्हर्नर बी. डी. शर्मा, यांच्याहस्ते झाले.

आयपीएल २०२४ भारतातच होणार?

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतात सध्या लोकसभा २०२४ च्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. त्याचदरम्यान भारतात जगातील सर्वात मोठी आयपीएल स्पर्धा पार पडणार आहे. निवडणुकांमुळे यंदाची आयपीएल विदेशात खेळवण्यात येणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, आयपीएलचा संपूर्ण हंगाम भारतात खेळवण्यासाठी बीसीसीआय उत्सुक आहे. त्या दृष्टीनेच तयार सुरू असल्याचे बीसीसीआय सूत्रांनी सांगितले असून आयपीएल भारतातच होणार यावर जवळपास शिक्कामोर्तब झाले आहे.

जगातील सर्वात मोठी टी-२० लीग ही यंदा २२ मार्चपासून सुरू होण्याची शक्यता आहे. बीसीसीआय सूत्राने एएनआयला दिलेल्या माहितीनुसार आयपीएल देशाच्या बाहेर खेळवली जाईल, अशी शक्यता नाही. लोकसभा निवडणूक आणि आयपीएल हंगाम एकाचवेळी होत आहे. त्यावेळी जे कोणते राज्य योग्य कारणामुळे आयपीएल सामना आयोजित करण्यास उत्सुक नसेल, तर तो सामना दुसऱ्या ठिकाणी खेळवण्यात येईल.

अफगाणिस्तानला मोठा धक्का!

राशिद खान दुखापतीमुळे भारताविरुद्धच्या टी-२० मालिकेतून बाहेर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट संघाविरुद्धच्या टी-२० मालिकेपूर्वी अफगाणिस्तान क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे. संघाचा स्टार अष्टपैलू राशीद खान मालिकेतून बाहेर आहे. राशीद पाठीच्या दुखापतीने त्रस्त होता. टी-२० क्रिकेटमधील जगातील सर्वात उत्कृष्ठ गोलंदाजांपैकी एक असलेल्या राशिदचा अफगाणिस्तानकडून न खेळणे हा संघासाठी मोठा धक्का आहे.

एकदिवसीय वर्ल्ड कप २०२३ नंतर राशीदच्या पाठीवर शस्त्रक्रिया झाली होती. दुखापतीमुळे तो ॲडलेड स्ट्रायकर्सकडून खेळला नाही. याशिवाय तो यूएईविरुद्धच्या सामन्यातही राष्ट्रीय संघाचा भाग बनला नव्हता. आता त्याच्या बाहेर पडल्याने संघाला मोठा धक्का बसला आहे.

राशिद हा अफगाणिस्तानचा नियमित कर्णधार आहे. मात्र भारताविरुद्धच्या मालिकेसाठी त्याच्या जागी इब्राहिम झद्रानकडे कर्णधारपद गेले आहे. युएईविरुद्धही झाद्रान कर्णधार होता.

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील पहिला सामना ११ जानेवारीला मोहाली येथे होणार आहे. उभय संघांमध्ये आतापर्यंत ५ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले गेले आहेत. ज्यापैकी भारताने चार जिंकले आहेत. एका सामन्याचा निकाल लागला नाही. अफगाणिस्तानविरुद्ध रोहित शर्मा आणि विराट कोहली भारतीय संघात परतले आहेत. या दोन्ही खेळाडूंना १४ महिन्यांनंतर टी-२० संघात खेळण्याची संधी मिळाली आहे.

गावदेवी चषक २०२३-२४ ओव्हरआर्म टेनिस क्रिकेट स्पर्धा

क्रिकेट स्पर्धेत फुलाईदेवी सासवणे संघ विजयी

। सोगांव । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील मापगाव येथील गावदेवी क्रीडा मंडळाने प्रथमच ''गावदेवी चषक २०२३-२४'' ओव्हरआर्म टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. अंतिम सामन्यात फुलाईदेवी सासवणे व गावदेवी मापगाव यांच्यामध्ये लढत झाली. या अटीतटीच्या लढतीत फुलाईदेवी सासवणे संघाने बाजी मारत प्रथम क्रमांक ५१००० हजार रुपये व चषक पटकावला, तर गावदेवी मापगाव संघाने द्वितीय क्रमांक ३१००० हजार रुपये व चषक पटकावला, तसेच बीसीसी आगरसुरे संघाने तृतीय क्रमांक २१००० हजार रुपये व चषक पटकावला. ६ जानेवारी ते ८ जानेवारी या कालावधीत या स्पर्धा पार पडल्या.

या स्पर्धांचे उद्घाटन शुक्रवारी ६ जानेवारी रोजी सकाळी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष सुनील थळे यांच्याहस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी मापगाव सरपंच उनिता थळे, उपसरपंच अनिता शिंदे, माजी सदस्य अनिल जाधव, चंद्रकांत खोत, युवा नेता सूचित थळे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाजचा मान बीसीसी आगरसुरे संघाचा आशिष म्हात्रे याला देण्यात आला, तर उत्कृष्ट गोलंदाजचा मान फुलाईदेवी सासवणे संघाचा विक्रम थळे याला देण्यात आला. तसेच मालिकावीरचा मान गावदेवी मापगाव संघाचा नितेश राऊत याला देऊन त्याला सायकल देण्यात आली. यावेळी शिस्तप्रिय संघ म्हणून बीसीसी आगरसुरे संघाचा सन्मान करण्यात आला.

बक्षीस वितरण समारंभ रायगड जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष सुनील थळे, काँग्रेस सेवा फाऊंडेशनचे रायगड जिल्हा अध्यक्ष उमेश ठाकुर, शिवसेना नेते(उद्धव ठाकरे गट) आमिर उर्फ पिंट्या ठाकुर, चांदोरकर यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी माजी मापगाव उपसरपंच समद कुर, रायगड जिल्हा काँग्रेस अल्पसंख्याक उपाध्यक्ष लाईक कप्तान, विवेक जोशी, माजी ग्रामपंचायत सदस्य अनिल जाधव, ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत खोत, सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी, बहिरोळे पोलिस पाटील प्रफुल्ल थळे, यांच्यासह क्रिकेट प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समालोचक म्हणून यश मापगावकर, इमरान बुखारी, सुहास फाटक यांनी उत्तमरीत्या काम केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)